सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. २८ मे २०२५ | वर्ष - तिसरे | अंक ५६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# परदेशी वस्तू खरेदी करू नका, पंतप्रधानांचे देशवासियांना आवाहन

### मेड इन इंडिया ब्रँडचा अभिमान वाटला पाहिजे

गांधीनगर , २७ मे – देशाचे नागरिक म्हणून तुम्ही सर्वांनी ऑपरेशन सिंदूरसाठी एक काम केले पाहिजे. घरोघरी जा आणि सकाळपासून संध्याकाळपर्यंत तुमच्या घरात किती परदेशी वस्तू वापरल्या जातात याची यादी बनवा. परदेशातील घरांमध्येही हेअरपिन आणि टूथपिक्सचा प्रवेश झाला आहे. तुम्हाला तुमच्याकडे असलेल्या परदेशी वस्तू फेकून देण्यास सांगत नाही. पण 'व्होकल फॉर लोकल'साठी तुम्ही नवीन परदेशी वस्तू खरेदी करणार नाही. बाहेरून आयात कराव्या लागणाऱ्या फक्त १-२ टक्के वस्तू येथे उपलब्ध नाहीत, इतर सर्व वस्तू आज भारतात बनवल्या जात आहेत. आज आपल्याला आपल्या मेड इन इंडिया ब्रँडचा अभिमान वाटला पाहिजे, असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला.

गांधीनगरमधील एका कार्यक्रमाला संबोधित करताना ऑपरेशन सिंदूरच्या यशाचा उल्लेख केला आहे. देशातील नागरिकांना परदेशी वस्तूंवरील अवलंबित्व संपवण्याचे आवाहन देखील केले. ऑपरेशन सिंदूरने केवळ लष्करी बळावर अवलंबून राहू नये, तर त्यात मनुष्यबळाचा सहभाग देखील आवश्यक आहे. तसेच यावेळी त्यांनी पाकिस्तानवर आणि दहशतवाद्यांवर जोरदार हल्लाबोल केला.

ऑपरेशन सिंदूर लष्करी शक्तीने नाही तर लोकांच्या शक्तीने जिंकायचे आहे आणि लोकशक्ती ही मातृभूमीत उत्पादित होणाऱ्या प्रत्येक गोष्टीतून येते, ज्यामध्ये या मातीचा सुगंध आहे. आपल्याला अशा गोष्टी वापरायच्या आहेत, ज्यांचा वास या देशातील नागरिकांच्या घामासारखा असेल. ही चळवळ प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवली पाहिजे. यामुळे देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचे स्वप्न पूर्ण होईल. २०४७ पर्यंत भारताला विकसित करण्यासाठी आणि जागतिक स्तरावर भारतीय अर्थव्यवस्थेला चौथ्या क्रमांकावरून तिसऱ्या क्रमांकावर नेण्यासाठी, आपण यापुढे कोणत्याही परदेशी वस्तूचा वापर करणार नाही. आपल्याला प्रत्येक गावातील व्यापाऱ्यांना अशी शपथ घ्यायची आहे की, परदेशी वस्तूंपासून त्यांना कितीही नफा झाला तरी ते कोणतेही परदेशी उत्पादन विकणार नाहीत. आज लहान डोळ्यांचे गणेशजी देखील परदेशातून आले आहेत,



गणेशजींचे डोळेही उघडत नाहीत. होळीसाठी रंग आणि वॉटर गन देखील परदेशातून येत आहेत. येथे पंतप्रधान मोदींनी थेट चीनचा उल्लेख करत त्यांचे उत्पादन सणांच्या काळात भारतीय बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात विकले जात असल्याचा देखील उल्लेख केला.

देशवासियांना आवाहन करताना मोदी म्हणाले की, देशाचे नागरिक म्हणून तुम्ही सर्वांनी ऑपरेशन सिंदूरसाठी एक काम केले पाहिजे. घरोघरी जा आणि सकाळपासून संध्याकाळपर्यंत तुमच्या घरात किती परदेशी वस्तू वापरल्या जातात याची यादी बनवा. परदेशातील घरांमध्येही हेअरपिन आणि टूथपिक्सचा प्रवेश झाला आहे. ते म्हणाले की, जर देशाला वाचवायचे असेल, बांधायचे असेल आणि पुढे घेऊन जायचे असेल तर ऑपरेशन सिंदूर ही केवळ सैनिकांची जबाबदारी नाही, तर ऑपरेशन सिंदूर ही १४० कोटी नागरिकांचीही जबाबदारी आहे.

ते पुढे म्हणाले की, मी तुम्हाला तुमच्याकडे असलेल्या परदेशी वस्तू फेकून देण्यास सांगत नाही. पण 'व्होकल फॉर लोकल' साठी तुम्ही नवीन परदेशी वस्तू खरेदी करणार नाही. बाहेरून आयात कराव्या लागणाऱ्या फक्त १-२% वस्तू येथे उपलब्ध नाहीत, इतर सर्व वस्तू आज भारतात बनवल्या जात आहेत. आज आपल्याला आपल्या मेड इन इंडिया ब्रँडचा अभिमान वाटला पाहिजे. ऑपरेशन सिंदूर लष्करी शक्तीने नाही तर लोकांच्या शक्तीने जिंकायचे आहे आणि लोकशक्ती ही मातृभूमीत उत्पादित होणाऱ्या प्रत्येक गोष्टीतून येते, ज्यामध्ये या मातीचा सुगंध आहे. आपल्याला अशा गोष्टी वापरायच्या आहेत ज्यांचा वास या देशातील नागरिकांच्या घामासारखा असेल. ते म्हणाले की, ही चळवळ प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहोचवली पाहिजे. यामुळे देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचे स्वप्न पूर्ण होईल.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, ६ मे नंतर जे काही दिसले, त्यानंतर आपण त्याला प्रॉक्सी वॉर म्हणण्याची चूक करू शकत नाही. याचे कारण म्हणजे जेव्हा दहशतवाद्यांचे ९ अड्डे फक्त २२ मिनिटांत उद्ध्वस्त करण्यात आले आणि यावेळी सर्व काही कॅमेऱ्यासमोर करण्यात आले जेणेकरून कोणीही आमच्या घरी येऊन पुरावे मागू नयेत. आता आपल्याला पुरावे देण्याची गरज नाही.

ते म्हणाले की,पाकिस्तानला हे लक्षात आलंय की, लढाईत तो भारतासोबत जिंकू शकत नाही. यासाठी त्यानं प्रॉक्सीवॉरचा आसरा घेतला आहे. त्यानं दहशतवादी तयार करायला सुरुवात केली आहे. त्यांना भारतात पाठवू लागला. आपण जेव्हा त्यांच्या दहशतवाद्यांना घरात घुसून मारतो तेव्हा ते सन्मानपूर्वक या दहशतवाद्यांना शेवटचा निरोप देतात. दहशतवाद्यांच्या अंत्ययात्रेला राजकीय सन्मान दिला जातोय. त्यामुळे आता याला प्रॉक्सी वॉर म्हणता येणार नाही. दहशतवादी कारवाया आता प्रॉक्सी वॉर राहिलेली नाही तर एका विचारपूर्वक आखलेल्या रणनीतीअंतर्गत केलेले युद्ध आहे आणि त्याला त्यानुसार प्रत्युत्तर दिले जाईल.

## बीड जिल्ह्यात भीषण अपघात; सहा जणांचा मृत्यू

बीड, २७ मे : बीड जिल्ह्यातून एक हृदयद्रावक अपघाताची घटना समोर आली आहे. धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गेवराई शहराजवळ गढी पुलावर मध्यरात्रीच्या सुमारास हा भीषण अपघात घडला. या दुर्घटनेत सहा जणांचा जागीच मृत्यू झाला आहे.


मिळालेल्या माहितीनुसार, एक एसयूव्ही गाडी गढी पुलाजवळ डिव्हायडरवर आदळून किरकोळ अपघात झाला होता. गाडीतील सर्व प्रवासी सुरक्षित होते आणि त्यांनी गाडी बाहेर काढण्यासाठी गाडीतून खाली उतरण्याचा निर्णय घेतला. मात्र, याच दरम्यान भरधाव वेगात येणाऱ्या ट्रकने त्या सहा जणांना जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, सर्वांचा घटनास्थळीच दुर्दैवी मृत्यू झाला आहे.

या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांची नावे पुढीलप्रमाणे : बाळू आतकरे, मनोज करांडे, कृष्णा जाधव, दीपक सरोया, भागवत परळकर आणि सचिन ननवरे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली व पुढील तपास सुरू केला आहे. सहा तरुणांच्या अपघाती निधनाने गेवराई शहरात शोककळा पसरली आहे. मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेने जिल्ह्यात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## राज्यातील अनुभवी शिक्षकांची होणार परीक्षा

मुंबई, २७ मे, : शिक्षकाने आपल्या सेवेची १२ वर्षे पूर्ण केल्यानंतर वरिष्ठ वेतन श्रेणी तर २४ वर्षे सेवा केल्यानंतर निवड श्रेणी प्रशिक्षण पूर्ण करावे लागते. यावर्षी हे प्रशिक्षण २ जून ते १२ जून या कालावधीत राज्यात एकाच वेळेस आयोजित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे यावेळी सर्व अनुभवी शिक्षकांची परीक्षा घेतली जाणार आहे. या परीक्षेत पात्र न ठरल्यास गुरुजींना पुन्हा प्रशिक्षण करावे लागणार आहे. त्यामुळे तूर्तास तरी राज्यातील अनुभवी गुरुजी टेन्शनमध्ये आहे.

विशेष म्हणजे यावर्षी पहिल्यांदाच प्रशिक्षणाच्या वेळी घेण्यात येणारी चाचणी आणि त्याचे गुणदान हा चर्चेचा विषय ठरत आहे. वरिष्ठ वेतन श्रेणी प्रशिक्षण चाचणीसाठी शंभर गुण, स्वाध्यायसाठी शंभर गुण, लेखी चाचणीसाठी ५० गुण तर अहवाल लेखनासाठी ५० गुण असे एकूण ३०० गुणांवर आधारित संपूर्ण मूल्यमापन होणार आहे. प्रशिक्षणा दरम्यान व नंतर अशा दोन्ही मूल्यमापन



प्रक्रियेत किमान ५०% गुण मिळवणे अनिवार्य आहे. अन्यथा पुन्हा नव्याने नोंदणी करून व शुल्क भरून याचप्रमाणे प्रशिक्षण पूर्ण करणे अपेक्षित आहे. या प्रशिक्षणात राष्ट्रीय शिक्षण २०२०,राज्य अभ्यासक्रम आराखडा, शिक्षण हक्क कायदा, शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा, ऑनलाईन शिक्षण,सायबर सुरक्षा, माहितीचा अधिकार, पर्यावरण व आपत्ती व्यवस्थापन, व्यवसाय शिक्षणासह ताण तनावाचे व्यवस्थापन मूल्यमापन,कृती संशोधन आदि वीस ते बावीस विषयांचा समावेश राहणार आहे.

प्रशिक्षण काळात दर ताशीकेनंतर दहा गुणांच्या चाचणीसह दहा स्वाध्याय पूर्ण करावे लागणार आहे. यातील पाच स्वाध्याय प्रत्यक्षात प्रशिक्षण दरम्यान वर्गात पाच घटकांवर आधारित स्वाध्याय राहणार आहे. उर्वरित पाच स्वाध्याय प्रशिक्षणानंतर वैयक्तिक स्वरूपात पूर्ण करावे लागणार आहे. संपूर्ण प्रशिक्षण पूर्ण केल्यावर शेवटच्या दिवशी ५० गुणांची लेखी चाचणी घेतली जाणार आहे. यात रिकाम्या जागा भरा, जोड्या लावा, एका वाक्यात उत्तरे द्या, टिपा लिहा, लघुत्तरी, उपयोजनात्मक व मुक्तोतरी प्रश्नांचा समावेश राहणार आहे.

शिक्षकी सेवेत रुजू झाल्यानंतर असलेली परिस्थिती व त्यानंतर झालेले अनेक बदल यासाठी शिक्षकांनी सर्व परिस्थिती हाताळण्यासाठी सक्षम व्हावे याकरिता या प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते. राज्यस्तरीय प्रशिक्षण एस सी आय आर टी पुणे येथे पार पडले.

## भाजपच्या २ आमदारांची पक्षातून हकालपट्टी

बंगळूरू, २७ मे : कर्नाटकातील भाजपच्या २ आमदारांची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. पक्षविरोधी कारवाया' केल्याच्या आरोपावरुन आमदार एसटी सोमशेखर आणि ए शिवराम हेब्बर यांना पक्षातून ६ वर्षांसाठी काढून टाकण्यात आल्याचे प्रदेशाध्यक्ष बी वाय विजयेंद्र यांनी दिली.

आमदार सोमशेखर आणि हेब्बर हे अनुक्रमे यशवंतपूर आणि येल्लापूर विधानसभा मतदारसंघांचे प्रतिनिधित्व करतात. बहिष्कृत आमदारांनी त्वरित प्रतिक्रिया दिलेली नाही. ए शिवराम हेब्बर हे २०१९ मध्ये जेडीएस-काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकार पाडण्यासाठी १७ बंडखोर काँग्रेस आमदारांपैकी शिवराम हेब्बर हे एक होते. शिवराम हेब्बर यांच्यावर पक्षविरोधी कारवायांमध्ये सहभागी असल्याचा आरोप होता. भाजपमध्ये येण्यापूर्वी शिवराम हेब्बर काँग्रेसमध्ये होते. कर्नाटकमध्ये गेल्या फेब्रुवारीमध्ये राज्यसभेच्या ४ जागांसाठी मतदान झाले. या चार जागांपैकी काँग्रेसने ३ आणि भाजपने एक जागा जिंकली. व्हीप जारी असूनही, एसटी सोमशेखर यांनी काँग्रेस उमेदवार अजय माकन यांच्या बाजूने मतदान केले, ज्यामुळे भाजपला फक्त एकच जागा जिंकता आली.

# आळंदीत इंद्रायणीच्या पाणी पातळीत वाढ, भक्ती सोपान पूल पाण्याखाली

पुणे: वारकरी संप्रदायांच्या महत्वाच्या स्थानांपैकी एक असलेल्या देवाची आळंदी देवस्थान आणि आजूबाजूच्या परिसरात मुसळधार पावसाने कहर केला आहे. सतत पडणाऱ्या पावसामुळे इंद्रायणी नदीच्या पातळीत वाढ झाली आहे. यामुळे नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना आळंदी नगरपरिषदेने दिल्या आहेत. याबाबत अधिक माहिती देताना नगरपरिषद मुख्याधिकारी माधव खांडेकर यांनी सांगितले की, आळंदीत इंद्रायणीच्या पाण्याची पातळी वाढत आहे. तसेच मावळ भागातही पावसाचा जोर कायम आहे. आळंदी आणि परिसरातही संतत धार सुरू आहे. याचा परिणाम इंद्रायणी नदीच्या पाण्याची



पातळी वाढत चालली असून, पुराचे पाणी भक्ती सोपान पुलावरून वाहत आहे. तसेच इंद्रायणी काठच्या पुंडलिक मंदिरात पाणी शिरले आहे.

नागरिकांना सतर्कतेचा इशारा

आळंदी नगरपरिषद मुख्याधिकारी माधव खांडेकर आणि आळंदी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक भीमा नरके यांनी इंद्रायणी काठी पाहणी करून नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेच्या सूचना दिल्या आहेत. इंद्रायणी नदीकाठच्या दगडी घाटावर पाणी वाहत असल्याने कोणत्याही नागरिकांनी पाण्यात उतरू नये. तसेच स्थानिकांनी सतर्क राहून प्रशासनाला सहकार्य करावे. असे आवाहन करण्यात आले आहे. संभाव्य पुरपरिस्थितीला आळा घालण्यासाठी आणि नुकसान टाळण्यासाठी, आपत्कालीन सेवा तैनात करण्यात आल्या आहेत. तसेच नागरिकांच्या सोयीसाठी आणि वेळोवेळी परिस्थितीची सूचना देण्यासाठी नगर परिषदेच्या वतीने ध्वनिक्षेपण देखील लावण्यात आले आहेत.

## मनपा निवडणुकीसाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे : राज ठाकरे

नाशिक, २७ मे : आगामी मनपा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी कामाला लागावे, असे आदेश मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी नाशिकच्या पदाधिकाऱ्यांना दिले. पदाधिकाऱ्यांनी शहरातील प्रभाग रचना, लोकसंख्या, मतदार संख्या आदींचा अभ्यास करून त्याचा अहवाल तयार करावा व ३० मे रोजी मुंबईत यावे, असेही राज यांनी पदाधिकाऱ्यांना सांगितले.



मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचे याआधी दोन वेळा राज ठाकरे यांच्या दौऱ्याची घोषणा होऊनही हे दौरे रद्द झाले होते. यावेळेस मात्र मनसे अध्यक्ष राज ठाकरे नाशिक दौ-यात उपस्थित राहून पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले व दौरा झटपट आटोपला. राज यांनी आपले बूथ मजबूत करून स्थानिक संघटन बळकट करण्यावर भर देण्यास सांगितले आहे. तसेच अपेक्षित प्रभागातील लोकसंख्या, मतदार संख्या, प्रभागाची सामाजिक रचना आणि त्यामधील तरुण व महिला मतदारांची संख्या यासंदर्भात सखोल अभ्यास करून त्यावर आधारित अहवाल तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. हा अहवाल येत्या ३० मेपर्यंत पूर्ण करून पक्षाकडे सादर करायचा आहे. राज यांचा नाशिक दौरा दोन वेळा रद्द झाला होता, तर राज ठाकरे हे दोन दिवस नाशिक दौऱ्यावर येणार, अशी माहिती मिळाली होती. मात्र त्यांनी काही तासांमध्ये नाशिकचा दौरा आटोपून पुण्याकडे रवाना झाले.

## नगरमध्ये अनधिकृत होर्डिंगवर कारवाईची मागणी

अहिल्यानगर दि. २७ मे : नगर शहरात मोठ्या प्रमाणात विनापरवाना आणि धोकादायक होर्डिंग उभ्या राहिल्या असून, त्याकडे महापालिकेचे अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा गंभीर आरोप सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. विनापरवाना होर्डिंगच्या एजन्सीवर गुन्हा दाखल करून त्यांचा परवाना रद्द करण्याची मागणी करुन महापालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडे तक्रार दाखल करून मुख्यमंत्री यांना निवेदन पाठवण्यात आले आहे.सदर प्रकरणात त्वरीत कारवाई न झाल्यास ३० मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर संघटनेच्या वतीने उपोषण करण्यात येईल, असा इशारा प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे पाटील यांनी दिला आहे.

नगर शहरातील अहिल्यानगर महापालिका हद्दीत अनेक



ठिकाणी सुरक्षा नियम धाब्यावर बसवून, विद्युत महावितरणच्या परवानगीविना अनधिकृत होर्डिंग उभारले गेले आहेत. हे होर्डिंग विद्युत तारांच्या अगदी जवळ उभे असल्याने विजेचा शॉक लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.यापूर्वी अशाच प्रकारच्या एका होर्डिंगमुळे विजेचा धक्का लागून एका युवकाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्या मुळे असे प्रकार पुन्हा घडल्यास महापालिका आणि जाहिरात एजन्सींवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

संघटनेने केलेल्या आरोपानुसार, जाहिरात एजन्सींनी कामगार सुरक्षेसाठी कोणतीही उपाययोजना राबवलेली नाही. त्यांच्याकडे खरे परवाने नसून बोगस कागदपत्रांवरच कामगार कार्यालयाकडून परवाने मिळवण्यात आले आहेत. या सर्व प्रकारात महापालिकेतील संबंधित अधिकाऱ्यांच्या संमतीशिवाय हे शक्य नाही, असा ठपका ठेवत संघटनेने त्यांच्यावरही कारवाई करण्याची मागणी केली आहे.

## देशात कोरोना रुग्णांची संख्या १000च्या पुढे, महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर

नवी दिल्ली: राजधानी दिल्लीत गेल्या आठवड्यात कोरोना साथीच्या रोगाचे नवे रुग्ण आढळले आहेत. दिल्लीत सध्या कोरोनाचे १०४ सक्रिय रुग्ण असून देशात कोरोना रुग्णांची संख्या एक हजारच्या पुढे गेली आहे.

आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, केरळमध्ये सर्वाधिक ४३० रुग्ण आहेत, त्यानंतर महाराष्ट्र २०९ आणि दिल्ली १०४ एक्टिव्ह रुग्णांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. तर कर्नाटकात ३४ नवीन रुग्ण आढळले आहेत. यासह राज्यातील एक्टिव्ह रुग्णांची संख्या ४७ झाली आहे. गुजरातमध्ये ७६ नवीन रुग्ण आढळले आहेत, आता राज्यातील एक्टिव्ह रुग्णांची संख्या ८३ झाली आहे. हरियाणामध्ये कोरोनाचे ८ नवीन रुग्ण आढळले आहेत. यासह राज्यातील एक्टिव्ह प्रकरणांची संख्या ९ झाली आहे. तर राजस्थानमध्ये ११ नवीन प्रकरणं नोंदवली गेली आहेत, एक्टिव्ह रुग्णांची संख्या १३ झाली आहे. याशिवाय पश्चिम बंगालमध्ये ११ नवीन रुग्ण आढळली आहेत. उत्तर प्रदेशात १५ नवीन रुग्ण आढळले आहेत. वाढत्या रुग्णसंख्येमुळे प्रशासनाने खबरदारीच्या सूचना दिल्या आहेत. तसेच गर्दीच्या ठिकाणी जाणं टाळा, मास्क लावा असा सल्ला देखील देण्यात आला आहे. मे महिन्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. मुंबईत दररोज सरासरी ९ जणांना कोरोनाची लागण होत आहे. मुंबईसह देशभरात कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येबाबत इंडियन मेडिकल काऊन्सिलने (आयएमए) कोरोनाला घाबरू नका, पण सतर्क राहा असं म्हटलं आहे. कोरोना व्हायरस पुन्हा परत येत आहे, परंतु त्याचा प्रभाव २०२० किंवा २०२१ सारखा नाही.

कोरोना आता येत राहील, म्हणजेच दर काही महिन्यांनी त्याचं नवीन रुप दिसू शकतं असं आयएमए कोविड टास्क फोर्सचे सह-अध्यक्ष डॉ. राजीव विजयदेवन यांनी सांगितले




## संक्षिप्त

### लघुउद्योग भारतीच्या अध्यक्षपदी कासलीवाल, सचिवपदी अग्रवाल

**पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत कार्यकारिणीची घोषणा**

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

जिल्हा लघुउद्योग भारतीची नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून, अध्यक्षपदी पंकज कासलीवाल यांची, सचिवपदी संजय अग्रवाल यांची, तर कोषाध्यक्षपदी पीयूष मुंदडा यांची निवड करण्यात आली आहे. घनसावंगी, बदनापूर आयटीआयचे प्राचार्य देवीदास राठोड यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवारी हॉटेल सॅफरॉन येथे सन २०२५-२६ या वर्षातील नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न झाला. यावेळी लघुउद्योग भारतीचे मराठवाडा सचिव राजेश कामड, मराठवाडा विभाग प्रचार प्रसारक अविनाश देशपांडे, माजी अध्यक्ष सतीश भक्कड यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य देवीदास राठोड यांनी आयटीआयच्या वतीने कुशल मनुष्यबळ निर्माण केले जाईल, असे सांगितले. राजेश कामड यांनी लघुउद्योगांना येणाऱ्या अडचणी, समस्या त्यावर कशी मात करावी, तसेच उपाययोजना करून यशोशिखर गाठण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रास्ताविकात मावळते अध्यक्ष सतीश भक्कड यांनी गत वर्षात लघुउद्योग भारतीतर्फे राबविण्यात आलेल्या उपक्रमांची माहिती दिली.

### लोकशाही दिनाचे २ जुन २०२५ रोजी आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

जिल्हास्तरीय लोकशाही दिन सोमवार दिनांक २ जून २०२५ रोजी सकाळी १०.०० ते दुपारी १२.०० या वेळेत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजन करण्यात आले आहे. लोकशाही दिनात अर्जदाराने विहित नमुन्यातील अर्ज १५ दिवस अगोदर दोन प्रतीत सादर करणे आवश्यक आहे. लोकशाही दिनासाठी अर्ज देताना संबंधित तालुक्यातील तिसऱ्या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज दिलेला असावा व तालुकास्तरीय लोकशाही दिनात एक महिन्यापेक्षा जास्त कालावधी होऊनदेखील कोणतीही कार्यवाही झालेली नसावी अशाच अर्जदारांनी टोकन क्रमांकाच्या पावतीसह अर्ज दोन प्रतीत सादर करावा. लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्वी, अपील, सेवाविषयक, आस्थापनाविषयक बाबी, विहित नमुन्यात नसणारे व आवश्यक ती कागदपत्रे न जोडलेले अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. तसेच तालुकास्तरीय लोकशाही दिनातील टोकन क्रमांकाची तहसिलदार यांच्या स्वाक्षरीची पोहोच पावती व त्यासाठी दिलेल्या मुदतीत व नमुन्यात ज्यांनी यापूर्वीच्या आवश्यक कागदपत्रासह अर्ज केले असतील त्यांना तक्रार मांडता येईल. ज्यांनी यापूर्वी जिल्हास्तरावरील लोकशाही दिनी तक्रार अर्ज दिलेला आहे परंतु अद्याप कार्यवाही झालेली नाही, अशा तक्रारदारांनी पुन्हा अर्ज करु नयेत. तसेच लोकशाही दिनात द्यावयाच्या अर्जाचा विहित नमुना हीींि://क्षरश्रपर.पळल.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

### जनमेजयराजे भोसले आणि शिवाजी राजेजाधव यांची पारधच्या ऐतिहासिक गढीला सदिच्छा भेट,गावात वाजत गाजत स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**पारध /प्रतिनिधी**

भोकरदन तालुक्यातील पारध येथे अक्कलकोट येथील श्री.स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, स्वामी सेवक जनमेजयराजे भोसले आणि मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील राजे लखुजीराजे जाधव यांचे वंशज शिवाजी राजेजाधव यांनी पारध येथील शाहू महाराज यांच्या पुरातन गढीला सदिच्छा भेट दिली.

सोमवार दि.२६ रोजी जनमेजयराजे भोसले आणि शिवाजी राजेजाधव यांनी येथील शाहू महाराज यांच्या प्रसिद्ध गढीला सदिच्छा भेट देऊन गढीवर भगवा ध्वज फडकवला.यावेळी नारायण देशमुख व अदिती देशमुख या दांपत्याने दोन्ही राजेंचा स्वागत केले, या वाड्याचा देखभाल करणाऱ्या गौरव देशमुख यांचा सत्कार राजेंच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांच्या सोबत हभप गंजिधर महाराज,शामराव मोरे,अभय खोबरे,भाऊ कापसे, लालाशेठ राठोड,संतोष भोसले,अशपाक काझी, स्वामिनाथ गुरव,संतोष माने,प्रभाकर सोनुने,राजेंद्र देशमुख हे देखील उपस्थित होते.येथील ऐतिहासिक गढीला भेट देण्या अगोदर त्यांची संपूर्ण गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली.गावातील गल्लोगल्ली सडा रांगोळ्यांनी रस्ते सुशोभित करण्यात आले होते. या मिरवणुकी दरम्यान त्यांनी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याला अभिवादन केले त्यानंतर जामा मस्जिद जवळ मुस्लिम पंच कमिटीचे अध्यक्ष अजहर पठाण यांच्यासह रफिक सौदागर,सलीम खान,निसार सेठ,आबेद शेख,जाफर शाह,सामी टेलर यांनी जनमेजयराजे भोसले व शिवाजी राजेजाधव यांचे शाल,श्रीफळ व पुष्पहार देऊन जंगी स्वागत करण्यात आले.या मिरवणुकी दरम्यान त्यांनी जयस्तंभ चौकाला भेट दिली तर महात्मा फुले यांच्या पुतळ्याला अभिवादन करून पुढे पारध ग्रामपंचायतला भेट दिली असता यावेळी सरपंच शारदाबाई काकफळे व शिवसेना उपजिल्हाप्रमुख मनिष श्रीवास्तव यांनी त्यांचे स्वागत केले.यावेळी त्यांनी श्री.स्वामी समर्थ केंद्राला देखील भेट दिली.

# घरकुल लाभार्थ्यांना नियोजन करून ५ ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून द्या - आ. अर्जुन खोतकर




तहसील कार्यालय जालना येथे आज जाळणाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी तहसीलदार जालना, महसूल अधिकारी व गटविकास अधिकारी पंचायत समिती जालना यांची संयुक्त बैठक घेऊन शासन निर्णयानुसार येत्या १० जून पर्यंत जालना तालुक्यातील घरकुल लाभार्थींना महसूल व पंचायत विभागाच्या अधिकारी कर्मचारी यांनी योग्य नियोजन करून ५ ब्रास मोफत वाळू उपलब्ध करून द्यावी, या कामी हलगर्जीपणा होणार नाही याची दक्षता घ्यावी असे निर्देश व सूचना दिल्या. वाळू घाटंचा लिलाव झाला नसल्याने घरकुल लाभार्थी यांना घरकुलचे बांधकाम करण्यासाठी अडचणी येत आहे, त्यामुळे शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार घरकुल लाभार्थी यांना ५ ब्रास वाळू उपलब्ध करून दिली जाणार आहे, ज्यामुळे त्यांचे घरकुलचे स्वप्नील पूर्ण होण्यास खूप मदत होणार आहे, व त्यामुळे काही प्रमाणात आर्थिक बचत ही होणार असल्याचे असे ते म्हणाले. परंतु सध्या जालना तालुक्यात पावसाने जोर धरल्याने शेतकरी व लाभार्थी चिंतेत सापडलेले दिसत असल्याने वाळू उपलब्ध करून देण्याची प्रक्रिया ही प्राधान्याने व योग्य ते नियोजन करून पार पाडावे. सदर योजना ही नियमानुसार व सध्याची नैसर्गिक परिस्थिती बघता कालमर्यादेत करणे आवश्यक आहे. सदर प्रक्रिया पार पाडताना पात्र लाभार्थी यांनी तलाठी व ग्रामपंचायत अधिकारी यांचे मार्फत किंवा स्वतः आधार क्र, मोबाईल क्र व घरकुल मंजुरी यादी क्र अपलोड केल्यानंतर व नजीकचा व सोयीचा वाळूघाट पसंतीनुसार नोंद केल्यानंतर सदरील पात्र लाभार्थ्यांना मोफत ५ ब्रास वाळूचे ई-पास देण्यात येणार आहे, वाळूघाटावर लाभार्थींची ओळख पटवून त्यांना वाळू दिली जाणार आहे. यासाठी गावनिहाय तलाठी व पंचायत अधिकारी यांनी हे काम चोख बजावून पूर्ण कारणे व त्यावर मंडळ अधिकारी व विस्तार अधिकारी यांनी आढावा घेऊन आलेल्या अडचणींचा निपटारा करून पर्यवेक्षण कारणे गरजेचे असून तहसीलदार व गटविकास अधिकारी यांनी त्याचे नियोजन व जवाबदारी पार पाडावी असे निर्देश व सूचना दिल्या, यावेळी आमदार खोतकर यांचेसह शहर प्रमुख विष्णू पाचफुले, उपजिल्हाप्रमुख संतोष मोहिते, बाजार समिती माजी संचालक बाबा मोरे जालना तहसीलदार श्रीमती छाया पवार, गटविकास अधिकारी संदीप पवार, नायब तहसीलदार खटावकर,नायब तहसीलदार राजु निहाळ,याचेसह संबंधित अधिकारी कर्मचारी यांची उपस्थिती होती.

तसेच राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती निमित्त योग्य व पात्र महिलांचा सन्मान व सत्कार यथोचित पार पाडण्याचे ही आदेशित केले.

घरकुल लाभार्थ्यांची झालेली कामे बघून पाहणी करून तात्काळ हप्ते वर्ग करण्याच्या गटविकास अधिकारी यांना सूचना

## पात्र घरकुलधारकांना प्रत्येकी पाच ब्रास रेती मोफत देण्यात येणार आ: नारायण कुचे

**तभा वृत्तसेवा**
**अंबड / प्रतिनिधी**

माननीय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार तसेच महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय दिनांक ८ एप्रिल २०२५ व ३० एप्रिल २०२५ अन्वये माननीय जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड तालुक्यातील पात्र घरकुलधारकांना पाच ब्रास रेती मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेपात्र लाभार्थी यांनी तलाठी ग्रामसेवक यांच्यामार्फत किंवा स्वतःही स्वतःचा आधार क्रमांक मोबाईल क्रमांक व घरकुल मंजुरीची यादी चा क्रमांक अपलोड केल्यानंतर सदरील पात्र लाभार्थ्यांना तहसीलमार्फत मोफत ई पास देण्यात येणार आहे आणि त्यांनी त्यांना असलेल्या नजीकच्या वाळूघाटापासून पसंती क्रमांक दिल्यास त्या वाळू घाटावरून त्यांची ओळख पटवून त्यांना पाच ब्रास रेती मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे अंबड तालुक्यात जवळपास पंधरा हजार पाचशे लाभार्थी असून त्यांच्या याद्या गावनिहाय तलाठी, मंडळ अधिकारी ग्रामसेवक यांना देण्यात आलेले आहेत.त्याचबरोबर त्यांच्याकडून अर्ज भरून घेण्याकरता गटविकास अधिकारी यांच्यामार्फत ग्रामसेवक यांना सांगण्यात आलेले आहे. तलाठी, मंडळ अधिकारी यांची बैठक घेऊन पात्र लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरता चे सर्व माहिती इत्यंभूतपणे देण्यात आलेली आहे सदर योजना ही १० जून २०२५ पर्यंत असल्याने सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपले वाहन व भरण्याकरता साहित्य घेऊन मंजुरी झाल्यानंतर रेती उपलब्ध करून घ्यायची आहे.सदर योजनेचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा याविषयी आवाहन करण्यात येते. त्याचबरोबर शासकीय यंत्रणांना शासकीय कामांना रेतीची मागणी झाल्या नुसार बारा हजार आठशे ब्रास रेती त्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे अंबड तालुक्यातील १० रेती घाटावरून सदरची रेती उपलब्ध करून देण्यात येणार असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे...उपरोक्त संदर्भ अन्वये माननीय नारायण कुचे विधानसभा सदस्य बदनापूर यांनी उपस्थिती लावून उपरोक्त शासन निर्णयानुसार पात्र घरकुलधारकांना मोफत पाच प्रास रेती देण्यात येणार असून सदर योजनेचा जास्तीत जास्त लोकांनी फायदा घ्यावा असे आवाहन केले, त्याचबरोबर उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी तथा सरपंच यांना सुद्धा सविस्तर मार्गदर्शन केले सदर वेळी तहसीलदार विजय चव्हाण, गटविकास अधिकारी उदय राजपूत, मुख्याधिकारी उकिरडे मनोज, नायब तहसीलदार विश्वास धर्माधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता दगुला व इतर प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते .

## शिक्षणाचे महत्व समजले तर भविष्य उज्वल होईल-जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

### महिला सक्षमीकरणासाठी उज्वल सेवाभावी संस्थेचा पुढाकार; हिरकणी पुरस्काराने कर्तबगार महिलांचा गौरव

**तभा वृत्तसेवा**
**जालना ,भोकरदन प्रतिनिधी**

तरुणांनी ध्येय प्राप्तीसाठी डोळ्यासमोर टार्गेट ठेवले पाहिजे. त्याशिवाय कोणतेच यश गाठता येत नाही. त्यासाठी प्रत्येकाला शिक्षणाचे महत्व कळाले पाहिजे तरच भविष्य उज्वल होईल असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले. जालना शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात दि. २६ मे २०२५ रोजी उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने महिला सक्षमीकरण अभियान अंतर्गत हिरकणी महोत्सव आयोजित केले होते. यावेळी उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी बोलत होते. दरम्यान व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के, प्रमुख पाहुणे म्हणून जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक सिध्दार्थ माने, शाहीर अप्पासाहेब उगले, छत्रपती शिवाजी महाराज विद्यापिठाचे प्रा. बापूराव बनसोडे, संस्थेच्या







अध्यक्षा सौ. करुणा अच्युत मोरे यांची उपस्थिती होती. राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या आणि सामाजिक उपक्रमात सहभाग घेणार्या कर्तबगार महिलांचा हिरकणी पुरस्काराने गौरव करण्यात आला. राज्यातील शाळकरी मुली आणि महिलावर होणारे बालात्कार आणि छेडछाडीच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी हिरकणी सुरक्षा अभियान सुरु करण्यात आले असून त्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी मोफत ड्रायव्हिंग आणि स्वसंरक्षण प्रशिक्षणासाठी लाभार्थी महिला आणि मुलीची लक्की ड्रा पध्दतीने निवड करण्यात आली. तत्पुर्वी उपस्थित महिलांना दामिनी पथकाच्या टीमकडून स्वसंरक्षण आणि निर्भीडपणे अन्यायाविरोधात न्याय मागण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. त्यानंतर महिला व बाल कल्याण विभागाच्या अंतर्गत महिलांसाठी सुरु असलेल्या वन स्टॉप सेंटरच्या प्रकल्प प्रमुख वनिता पिंपळे यांनी अत्याचार पिडीत किंवा अडचणीच्या काळता महिलांसाठी असलेल्या योजनेची माहिती दिली. तसेच महिला व बाल कल्याण विभागाचे इंगळे यांनी एकल पालकत्व, लेक लाडकी, बाल संगोपन यासह विविध योजनेची माहिती देत अर्जही उपलब्ध करुन दिले. तर पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून स्थानिक गुन्हे शाखेचे संजय सोणवने यांनी मुलींना स्वसंरक्षण, सायबर सुरक्षा आणि महिला सुरक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन केले. त्यानंतर महिलांसाठी आयोजित केलेल्या होम मिनीस्टर कार्यक्रमात महिलांनी पैठणी, चांदीचं नाणं, रोख रक्कम असे विविध बक्षिसं जिंकून आनंदोत्सव साजरा केला. तर शाहीर रामानंद उगले यांचा सांस्कृतीक कार्यक्रम पार पडला. दरम्यान जिल्हाधिकारी यांनी आपल्या भाषणातून महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात मार्गदर्शन केले. मराठवाड्यात महिला सक्षमीकरणाची अत्यंत गरज असून अनेकांच्या मानसीकतेत बदल करण्यात गजर आहे. आणि त्या दृष्टीने उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्था सक्रीयपणे काम करत आहे. मराठवाड्यात महिलांच्या बाबतीत कमी असलेले लिंग गुणोत्तर, मुलीचे शिक्षण, लग्नाचे वय, मुलीचे घरातील तसेच समाजातील स्थान, काम करण्याच्या ठिकाणचे स्थान, प्रॉपर्टीमध्ये स्थान यावर काम झाले पाहिजे. सामाजिक विचार करुन महिला आपल्या प्रॉपर्टीवरील हक्क सोडून देतात.परंतु, तीने जर प्रॉपर्टी मागीतली तर घरात वाद सुरु होतात. दोन मुला-मुलीतील भेदही पहायला मिळतात, कुणाला किती शिकवायचे हे त्या कुटुंबाच्या मानसीकतेवर अवलंबून असते. मुलीला काहीहीही शिक्षण भेटले तरी छान म्हणून पुढे घेऊन जातात. मात्र मुलाच्या अनुषंगाने त्याला हवं ते जोपर्यंत भेटत नाही, तोपर्यंत रिपीट प्रयत्न करायला सांगता. त्याच्यासाठी घर गहान ठेवण्याची तयारी देखील असते. त्यामुळे त्यांच्या मानसीकता बदलन्यासाठी शासन प्रयत्न करीत असले तरी त्यात संस्थांचा महत्वाचा रोल आहे. असेही जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगीतले.


#### मुली आणि महिलांना मोफत स्वसंरक्षण व चारचाकी वाहन प्रशिक्षण

या हिरकणी सुरक्षा अभियानाच्या माध्यमातून मुली आणि महिलांना स्वसंरक्षणाचे धडे दिले जाणार असून लोकसहभागाच्या माध्यमातून १०० मुलींना मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण देऊन महिला वाहनचालक तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते चिठ्ठी काडून लक्की ड्रॉ पध्दतीने सुरु करण्यात आला आहे. यावेळी चिठ्ठी काढून काही मुलींची चारचाकी वाहनचालक प्रशिक्षणासाठी मुलींची निवड करण्यात आली. शाळकरी मुलीवर आणि टॅक्सी चालकाकडून महिलावर होणारे बालात्कार कमी करण्यासाठी महिला ड्रायव्हर घडविण्यात येत आहेत. त्यासाठी मुलींना आणि महिलांना मोफत चारचाकी वाहन प्रशिक्षण देऊन त्यांना स्वसंरक्षाणाचे प्रशिक्षणही देण्यात येत आहे.

## समाजसेवेच्या आदर्शांचा गौरव - अहिल्यादेवी होळकर ३०० वी जयंतीनिमित्त जनजागृती उपक्रम

**समाजसेवेच्या आदर्शांची आठवण, अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त जिल्हाभरात जनजागृती कार्यक्रम - भास्कर दानवे**

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**



२७ मे २०२५ : मराठवाड्याच्या भूमीवर गौरवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त जालना जिल्ह्यात २१ मे ते ३१ मे २०२५ दरम्यान विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या जयंती महोत्सवात संपूर्ण जिल्हाभरात लोकसहभाग वाढवण्यासाठी आणि अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सर्वांनी कार्यक्रमात सहभावी व्हावे असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले आहे.

* यामध्ये निबंध व रांगोळी स्पर्धा दिनांक: २८ मे २०२५ रोजी दुपारी ३ ते ५ दरम्यान बालाजी मंदिर, कचेरी रोड येथे असणार आहे, सहभागासाठी सौ. संध्याताई देठे ९४२२२६९५५५, सौ.शुभांगीताई देशपांडे ९०२१३३७२८६, सौ.अरुणाताई जाधव ८९९९७३४८३४ यांच्याशी संपर्क करावा.
* मंदिर स्वच्छता, महाआरती, वेदपठन व भक्तिगीत दिनांक: २८ मे रोजी श्रीराम मंदिर, पलंगबावडी, जुना जालना व २९ मे जोगेश्वरी माता मंदिर, पाहेगाव या ठिकाणी करण्यात येणार आहे.
* नाटक, पथनाट्य, चित्ररथ प्रदर्शन हे दिनांक: २८ मे सकाळी १०.०० वा सावरकर चौक, गांधी चमन चौक येथे होणार आहे.
* महिला मेळावा (अहिल्यादेवी वेशभूषेत मिरवणूक) दिनांक: ३१ मे रोजी सकाळी १०.०० वा अमृतेश्वर महादेव मंदिर ते बालाजी मंदिर दरम्यान करण्यात येणार आहे.
* वकृत्व स्पर्धा दिनांक : ३० मे रोजी, भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे होणार आहे, या उपक्रमांबाबत अधिक माहिती आणि सहभागासाठी प्रा.राजेंद्र भोसले ९४२२९९२५५५ यांच्याशी संपर्क साधावा.
* महिला मॅरेथॉन दिनांक: ३१ मे सकाळी ६.०० वा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून होणार आहे.
* बुद्धिजीवी संमेलन दिनांक: ३१ मे रोजी सायं. ५.०० वा भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे होणार आहे.

या कार्यक्रमांच्या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी आपल्या जीवनकार्याद्वारे समाजास दिलेल्या मूल्यांचा जागर करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून ऐतिहासिक जयंती महोत्सवात योगदान द्यावे, असे आवाहन सौ. संध्याताई देठे, सौ. शुभांगीताई देशपांडे, सौ. अरुणाताई जाधव, श्री. कपिल दहेकर, श्री. तुलजेश चौधरी, श्री. सुनिल खरे, श्री. महेश निकम, श्री. संजय डोंगरे, श्री. अमोल धानुरे, श्री. कृष्णा गायके, श्री. कृष्णा लिंगसे श्री. कैलास सचदेव, सौ. रश्मी टेकवाणी, सौ. रेखा टेकवाणी, श्री. सतीशचंद्र प्रभू, श्री. विकास कदम, श्री. मनोज बिडकर आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

## परतूर नगर परिषद व आ. लोणीकर यांच्या समन्वयातून घरकुल उपोषणास तात्काळ स्थगिती

### कार्यकर्त्यांचा इशारा - ठोस कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलन छेडणार

**तभा वृत्तसेवा**
**परतूर /प्रतिनिधी**

परतूर शहरातील गोरगरीब, वंचित नागरिकांसाठी हक्काच्या घराच्या मागणीसाठी २६ मे २०२५ रोजी होणारे उपोषण तात्पुरते स्थगित करण्यात आले आहे. बिरसा मुंडा नगर, अण्णाभाऊ साठे नगर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर, इंदिरा नगर व नागसेन नगर येथील नागरिक गेल्या अनेक वर्षांपासून विविध घरकुल योजनांचा लाभ मिळवण्यासाठी संघर्ष करत आहेत. मात्र, अद्याप त्यांच्या मुलभूत हक्काची – म्हणजेच स्वतःच्या घराची – पूर्तता झालेली नाही. या पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते अॅड. सुरेश काळे, नरेश कांबळे व सावता काळे यांनी एकत्र येऊन २६ मे रोजी उपोषणाचा इशारा दिला होता. शासनाच्या घरकुलप्रधान योजनांमध्ये प्रधानमंत्री आवास योजना, माता रमाई आवास योजना, शबरी माता आवास योजना तसेच अन्य योजनांचा समावेश असून, या योजनांचा लाभ गेल्या ७० वर्षांपासून या वस्तीतील गरीब कुटुंबांना मिळालेला नाही, ही खंत या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.विशेष म्हणजे, मागील ३५ वर्षांपासून परतूर नगर परिषदेमध्ये जे पक्ष किंवा व्यक्ती सत्ता भोगत आहेत, त्यांनी केवळ मतांचे राजकारण करून या वस्तीतील लोकांच्या घराच्या मूलभूत गरजेकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही आंदोलनकर्त्यांनी



केला आहे.ही व्यथा शासकीय आढावा बैठकीत मांडण्यात आली असता, आमदार बबनराव लोणीकर यांनी याबाबत तात्काळ सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यांनी नगर परिषद परतूरच्या मुख्याधिकाऱ्यांना निर्देश दिले की, घरकुल लाभार्थ्यांच्या कागदपत्रांमध्ये वापरला जाणारा 'काबीज' हा शब्द हटवून, त्यांना 'मालकी हक्काने' घरे देण्याच्या दृष्टीने त्वरित कार्यवाही करण्यात यावी.या हस्तक्षेपामुळे आंदोलनकर्त्यांनी २६ मेचे उपोषण काही काळासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, नगर परिषद प्रशासनाने याबाबत तातडीने ठोस निर्णय घेतला नाही, तर पुढील काळात मोठ्या प्रमाणावर जनआंदोलन उभारले जाईल.

गोरगरीबांचा सात दशकांचा संघर्ष या वसाहतींमध्ये राहणारे नागरिक गेल्या अनेक दशकांपासून शासनाच्या योजनांकडे आशेने पाहत आहेत. घरकुल योजनेचा लाभ मिळावा म्हणून त्यांनी वेळोवेळी अर्ज केले, पाठपुरावा केला; परंतु स्थानिक राजकारण, प्रशासकीय दिरंगाई व निधीच्या अपुऱ्या वितरणामुळे त्यांचे हे स्वप्न आजतागायत अपूर्ण राहिले आहे.

सकारात्मक दिशा, पण वाट पाहणे अजून बाकी आमदार बबनराव लोणीकर यांनी दिलेल्या सकारात्मक सूचनांमुळे या भागातील नागरिकांमध्ये काही प्रमाणात आशा निर्माण झाली आहे. मात्र या सूचना प्रत्यक्षात उतरल्या जाईपर्यंत आंदोलनकर्ते शांत बसणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

नगर परिषद परतूर व संबंधित प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष दिले, तरच या वस्तीतील कुटुंबांना न्याय मिळेल आणि 'घर हक्काचे' हे स्वप्न प्रत्यक्षात उतरू शकेल.

## अग्रलेख...

# अर्थव्यवस्थेचा अमृतकाळ!

सुमारे दोन वर्षांअगोदर, जेव्हा भारताची अफाट लोकसंख्या हे भविष्यातील संकट आहे अशा समजुतीने संपूर्ण देश धास्तावला होता, तेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या समजुतीतून देशाला बाहेर काढण्याचे महत्त्वाचे काम केले आणि देशाची प्रचंड लोकसंख्या हे संकट नसून संधी आहे, असा दिलासा दिला. देशाची लोकसंख्या ही देशाची संपत्ती आहे, हे त्यांचे शब्द त्यानंतर सातत्याने सत्य ठरत गेल्याचे आज मागे वळून पाहताना दिसत आहे. दोन वर्षांपूर्वी, एप्रिल २०२३ मध्ये चीनला मागे टाकून भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्येचा देश ठरला, तेव्हा त्याचा गर्व वाटावा की वाढत्या लोकसंख्येसोबत येणाऱ्या समस्यांच्या चिंतेने भविष्याची काळजी करायची असा प्रश्न अनेकांना पडला होता. पण संकट ही संधी असल्याचे मानून लोकसंख्येचा विकासाच्या वाटचालीत सहभाग वाढविण्याचा कल्पक कार्यक्रम मोदी सरकारने हाती घेतला. देशातील सर्वाधिक संख्येने असलेली तरुणाई ही जगाच्या कोणत्याही देशातील तरुणांहून अधिक प्रतिभाशाली आहे आणि हीच भारताची ताकद आहे, याची जाणीव पंतप्रधान सातत्याने करून देत होते, तेव्हा लोकसंख्येच्या विस्फोटाची लाज वाटण्याची मानसिकता अभिमानाच्या भावनेत बदलत गेली. आज त्या अभिमानाची भावना उत्तुंगतेच्या शिखरावर पोहोचली असून, भारताच्या आर्थिक विकासात देशातील तरुणाई आणि प्रतिभाशाली लोकसंख्येचा वाटा मोठा असल्याचेही सिद्ध झाले आहे. स्टार्टअपसारख्या नवसंकल्पनांनी देशात घेतलेली उभारी, उद्योग, तंत्रज्ञान, विज्ञान, अवकाशविज्ञान, संरक्षण, अशा असंख्य क्षेत्रांत भारताने घेतलेल्या भराऱ्यांनी जगाचे डोळे दिपलेले असतानाच, देशाने आर्थिक आघाडीवर मारलेली मजल हा जगाच्या दृष्टीने कौतुकाचा आणि अभ्यासाचाही विषय ठरला आहे. मोदी सरकारच्या सत्ताकाळातील पहिल्या दशकभरातच, भारताच्या आर्थिक महासत्ता बनण्याच्या स्वप्नाने वास्तविक आकार धारण केला असून, कोणे एके काळी ज्या जपानच्या आर्थिक उन्नतीची उदाहरणे भारतात दिली जात होती, त्याच जपानलाही मागे टाकून भारत ही जगातील चौथ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता म्हणून अभिमानाने प्रस्थापित झाला आहे. ही तर नव्या वाटचालीची केवळ सुरुवात आहे आणि पुढचा आव्हानात्मक टप्पा आता खऱ्या अर्थाने सुरू झाला आहे. भारत ही जगातील पहिल्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता म्हणून ओळखली जावी, अशी भावना पंतप्रधान मोदी यांनी याआधी जेव्हा जेव्हा व्यक्त केली, तेव्हा तेव्हा त्यांच्या राजकीय विरोधकांनी त्यांचे हे मत हसण्यावारी नेले होते. असे होऊ शकेल, असा आत्मविश्वास याआधी कोणीच फारसा कधी बोलूनदेखील दाखविलेला नसल्याने मोदी यांचे हे दिवास्वप्न असावे, असाच अनेकांचा समज होता आणि प्रचंड लोकसंख्येच्या समस्येमुळे या स्वप्नात अडथळेच अधिक असतील, अशीच अनेकांची भाकिते होती. मात्र, मोदी यांनी ही भाकिते खोटी ठरविली आणि उत्तमाच्या ध्यासाने लोकसंख्येच्या प्रत्येक क्षमतेस विधायक संकल्पांच्या पूर्तीसाठी वापरण्याचे कौशल्य दाखविले. शेतकरी असो, तरुण वर्ग असो, महिला असोत किंवा मध्यमवर्ग समाज असो, या प्रत्येक वर्गाच्या त्यांच्या त्यांच्या क्षेत्रातील कौशल्याचा पुरेपूर वापर करून घेणाऱ्या अनेक योजना गेल्या दशकभरात अस्तित्वात आल्या आणि त्यामुळेच अर्थव्यवस्थेची बिघडलेली घडी बसविण्याचे आव्हान पेलले गेले, हे स्पष्ट आहे. याआधी देशाची आर्थिक स्थिती वाईट होती, देश आर्थिक विपन्नावस्थेच्या खाईत लोटला गेला होता असा याचा अर्थ नव्हे. डॉ. मनमोहन सिंह यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञ पंतप्रधानांच्या कारकीर्दीतच या देशात आर्थिक सुधारणांचे पर्व सुरू झाले, जगाच्या आर्थिक पटलावर भारताचे स्थान अधोरेखित होऊ लागले ही बाब नाकारता येणार नाहीच, पण त्यापुढे जाऊन, आर्थिक शक्ती म्हणून देशाची प्रतिष्ठा उंचावता येऊ शकते हा आत्मविश्वास सामान्य जनतेच्या मनात रुजविण्याचे श्रेय मोदी सरकारला द्यावेच लागेल. मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत, किसान सन्मान, महिला सन्मान, युवा भारत अशा अनेक संकल्पनांतून सरकारने समाजाच्या प्रत्येक घटकाचा आत्मविश्वास वाढविला, त्यांना कर्तबगारी सिद्ध करण्याचे प्रोत्साहनही दिले आणि त्याची फळे दिसू लागली. आता भारत देश जगातील चौथ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता म्हणून सिद्ध झाला असून, ४.८७ ट्रिलियन डॉलर्स एवढ्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाची उच्चांकी झेप घेऊन जपानच्या अर्थव्यवस्थेस मागे टाकण्याची भारताची तयारी झाली आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या एप्रिल २०२५ च्या निरीक्षणातूनच हे भाकीत नोंदविले गेले होते. येत्या तीन वर्षांत, सन २०२८ पर्यंत जर्मनीच्या अर्थव्यवस्थेसही मागे टाकून भारताने तिसऱ्या क्रमांकाचे स्थान पटकावलेले असेल, या आत्मविश्वासास आता नवे बळ मिळाले असून पुढचा टप्पा दृष्टिपथात आल्याने, नव्या वाटचालीसाठी देश सिद्ध झाला आहे.

अमेरिका ही जगातील पहिल्या क्रमांकाची, ३०.५०७ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था आहे, त्यापाठोपाठ चीनची अर्थव्यवस्था १९.२३१ ट्रिलियन डॉलर्सची असून जर्मनीच्या अर्थव्यवस्थेने ४.४७ ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा गाठला आहे. चौथ्या क्रमांकावरील भारताची अर्थव्यवस्था आता ४.१८७ ट्रिलियन डॉलर्सवर दाखल झाली असल्याने, जर्मनीला मागे टाकण्याचे आव्हान आता फार दूर नाही हे निश्चित झाले आहे. अमेरिका आणि चीनच्या अर्थव्यवस्थेपर्यंत पोहोचण्याचा टप्पा खडतर असून हे आव्हान सोपे नाही, हे खरे असले, तरी जेमतेम दोनअडीच दशकांपूर्वी केवळ विकसनशील देशांच्या रांगेत असलेल्या भारताने तिसऱ्या क्रमांकाच्या अर्थव्यवस्थेला आव्हान देण्याइतपत मारलेली मजल ऐतिहासिक म्हणावीच लागेल. सन २०३२ मध्ये, म्हणजे येत्या सात वर्षांत भारताची अर्थव्यवस्था १० ट्रिलियन डॉलर्सवर पोहोचलेली असेल, असा अहवाल गेल्या वर्षी सप्टेंबरमध्ये आडीबीआय कॅपिटल या वित्तक्षेत्रातील आघाडीच्या संस्थेने दिला होता. उत्पादनक्षेत्रात भारत लवकरत चीन, अमेरिकेसही मागे टाकेल, असेही या संस्थेचे भाकीत होते. २०२४ मध्ये भारताची अर्थव्यवस्था ३.९१ ट्रिलियन डॉलर्स होती आणि पुढच्या जेमतेम सहा महिन्यांतच या अर्थव्यवस्थेने ४.१८७ ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा गाठला, तेव्हाच आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताच्या विक्रमी वाटचालीची नोंद घेतली होती. भारत ही जगातील सर्वाधिक वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था ठरली आहे, हे खरे तर कोविड महामारीनंतर जागतिक अर्थकारणास उतरती कळा लागलेली असतानाही सिद्ध होत होते. जगातील अनेक देश आर्थिकदृष्ट्या अक्षरशः कोलमडण्याच्या स्थितीत असताना, भारताने मात्र महामारीचे संकट झेलूनही अर्थव्यवस्थेचा डोलारा सांभाळण्याची कसरत यशस्वीपणे पार पाडली. भारताच्या औद्योगिक क्षेत्राने आज जागतिक औद्योगिक पटलावर मान्यता मिळविली आहे, मध्यमवर्ग म्हणून वर्णिल्या जाणाऱ्या जनतेची वाढती क्रयशक्ती बाजारपेठांना नवी ताकद देणारी ठरत आहे, पायाभूत सुविधा आणि उत्पादनक्षेत्रांनी नवी उंची गाठली आहे आणि येत्या दशकावर या क्षेत्राचे वर्चस्व असेल. भारतातील गुंतवणुकीचा वाढता ओघ हे तर त्याचे स्पष्ट लक्षण असून महाराष्ट्रानेही त्यामध्ये आपला मोलाचा वाटा उचलला ही आपल्यासाठी अधिक अभिमानाची बाब ठरली आहे.

भारताच्या यशस्वी वाटचालीने गेल्या दहा वर्षांत घेतलेली ही झेप म्हणजे, गेल्या जवळपास अडीचशे वर्षांनंतरची मरगळ झटकून निर्माण केलेला एक इतिहास ठरणार आहे. जागतिक आर्थिक महासत्तांच्या रांगेत चौथ्या क्रमांकावर झेप घेण्याचा हा इतिहास आता भविष्याच्या नव्या उन्नतीचे स्पष्ट संकेत देणारा असल्याने भारतीयांच्या मनाला आणि क्षमतांनाही उभारी देणारा ठरेल यात शंका नाही. मोदी सरकारने सत्ताग्रहण करताना एक संकल्प केला होता. 'परं वैभवं नेतुमेतत्स्वराष्ट्रम्?' हा संकल्प म्हणजे केवळ प्रार्थना नव्हती, तर ती प्रतिज्ञा होती. समर्पित राष्ट्रभावनेच्या प्रखर संस्कारांतून केलेल्या या प्रतिज्ञेची पूर्तता होण्याच्या दिशेने सुरू झालेली ही वाटचाल जगाने अनुभवली आहे. प्रत्येक क्षेत्रांतील आत्मनिर्भर आणि नव्या आत्मविश्वासाने भारलेल्या नव्या भारताच्या पराक्रमाला जगाची दाद मिळेल, यात आता तिळमात्र शंका राहिलेली नाही. म्हणूनच, भारताच्या दृष्टीने हा खरा अमृतकाळ ठरत आहे, असे म्हणता येईल.

## आंतरराष्ट्रीय

**प्रा. जयसिंग यादव**

# आर्थिक प्रगतीकडून अधोगतीकडे

बांगलादेशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी राजीनामा देण्याची इच्छा व्यक्त केल्याच्या बातमीने देशातील राजकीय वादविवाद आणखी तीव्र झाला आहे. 'नॅशनल सिटिझन्स पार्टी' (एनसीपी) चे संयोजक नाहिद इस्लाम यांनी याबाबत युनूस यांची भेट घेतली. त्या भेटीमध्ये युनूस यांनी सर्वपक्षीय सहकार्य मिळत नसल्याची भावना व्यक्त केली असली, तरी प्रत्यक्षात त्यांचे वर्तन 'बांगलादेश नॅशनल पार्टी'ला धार्जिणे राहिले आहे. शेख हसीना यांच्या अवामी लीग या पक्षावर त्यांनी बंदी घातली. आता तर युनूस आणि बांगलादेशच्या लष्कर प्रमुखामध्ये शीतयुद्ध सुरू झाले आहे. बांगलादेशचे परराष्ट्र सचिव जशीमुद्दीन यांच्या अचानक राजीनाम्यामुळे युनूस यांच्याही राजीनाम्याची चर्चा सुरू झाली. तत्पूर्वी, 'बीएनपी' नेते इशराक हुसेन यांच्या समर्थकांनीही ढाक्यातील रस्त्यांवर निदर्शने करून स्थानिक सरकार सल्लागार आसिफ महमूद संजीव भुईयान आणि माहिती सल्लागार महफुज आलम यांच्या राजीनाम्याची मागणी केली. दरम्यान, एका वरिष्ठ नेत्याने अंतरिम सरकारच्या तीन सल्लागारांना 'बीएनपी प्रवक्ते' असे संबोधले आहे आणि सुधारणांच्या शिफारशी लागू न केल्यास राजीनामा देण्यास भाग पाडण्याची धमकी दिली आहे. यामध्ये कायदेशीर सल्लागार प्रोफेसर आसिफ नजरुल, वित्त सल्लागार सलाहुद्दीन अहमद आणि नियोजन सलागार डॉ. वहिदुद्दीन महमूद यांचा समावेश आहे. युनूस यांनी सांगितले की, सर्व राजकीय पक्षांमध्ये एकमत नसेल तर ते काम करू शकत नाहीत.

वस्तुत: एका जनआंदोलनानंतर मोहम्मद युनूस यांची या पदासाठी निवड झाली; पण आता ज्या पद्धतीने आंदोलन सुरू आहे आणि त्यांना ज्या प्रकारे ओलिस ठेवले जात आहे, त्या स्थितीत काम करणे शक्य नाही. काहींनी मनधरणी केल्यानंतर युनूस यांनी त्यांच्या राजीनाम्याच्या मुद्यावर विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. त्याच वेळी 'बीएनपी'ने पत्रकार परिषद घेऊन अंतरिम सरकारच्या वादग्रस्त सल्लागारांना काढून टाकण्याची मागणी केली. नव्याने स्थापन झालेला राष्ट्रीय नागरिक पक्ष (एनसीपी) हा गेल्या वर्षी जुलैमध्ये झालेल्या बंडाचे नेतृत्व करणारा युवा पक्ष आहे. त्याचे मुख्य संयोजक हसनत अब्दुल्ला यांनी फेसबुक पोस्टमध्ये लिहिले आहे की, देश आणि राष्ट्राच्या हितासाठी या अनपेक्षित विभाजनावर तोडगा काढला पाहिजे. दरम्यान, 'जमात-ए-इस्लामी'चे अमीर शफीकुर रहमान यांनी देशातील सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन लवकरच सर्वपक्षीय बैठक बोलावण्याचे आवाहन युनूस यांना केले आहे; मात्र बांगलादेशच्या अंतरिम सरकारने अवामी लीगवर बंदी घातली. लष्करप्रमुख वकार-उझ-जमान यांनी डिसेंबरपर्यंत सार्वत्रिक निवडणुका घेण्याचे



आवाहन केले. परराष्ट्र सचिव जशीमुद्दीन यांनी राजीनामा दिला आहे. युनूस आणि परराष्ट्र व्यवहार सल्लागार तौहीद हुसेन यांच्याशी कथित मतभेद आणि समन्वयाचा अभाव यामुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे. फक्त आठ महिन्यांपूर्वी त्यांची नियुक्ती झाली होती. बांगलादेशचे अमेरिकेतील राजदूत असम आलम श्याम हे पुढील परराष्ट्र सचिव होण्याची शक्यता आहे.

गेल्या वर्षी एका मोठ्या जनआंदोलनातून हंगामी सरकार आले, तेव्हा हे सरकार अल्पकाळ असेल आणि तिथल्या संसदेच्या निवडणुका लवकर घेतल्या जातील, असे सांगण्यात आले होते; परंतु गेल्या दहा महिन्यांमध्ये निवडणुका झालेल्या नाहीत. आता लष्करप्रमुख वकार-उझ-जमान यांनी सरकारला मुदत घालून दिली आहे. गेल्या वर्षी आंदोलन होईपर्यंत बांगलादेशचा जीडीपी आशिया खंडात नोंद घेण्यासारखा होता. या देशातून जगभर निर्यात होत होती. विशेषतः कापड उद्योगाने जगभरात नावलौकिक कमावला होता. गेल्या दहा महिन्यांमध्ये मात्र बांगलादेशमधील हिंसाचार आणि भारतविरोधी भूमिकेमुळे बांगलादेशची कोंडी झाली आहे. चीन मदत करत असला, तरी तो काहीही फुकट करत नाही. ज्या पश्चिम पाकिस्तानच्या छळाला कंटाळून बांगलादेशची निर्मिती झाली, त्यानेच आता पाकिस्तानसोबत जुळवून घेतले आहे. अतिरेकी संघटनांना रान मोकळे केले आहे. भारताने आर्थिक कोंडी केल्याचा परिणाम म्हणून बांगलादेशची निर्यात महागणार आहे. भारताने बांगलादेशच्या मुक्तिसंग्रामात महत्त्वाची भूमिका बजावली; परंतु तोच बांगलादेश आता भारताविरोधात गरळ ओकत आहे. त्याचा परिणामही त्यालाच भोगावा लागतो आहे. भारताने बांगलादेशला 'मोस्ट फेवर्ड नेशन'चा दर्जा दिला होता.

'बीएनपी'चे सदस्य मिर्झा फखरुल इस्लाम यांनी म्हटले आहे की, देशाच्या लोकशाही भविष्यावर 'नवीन काळी सावली' पसरत आहे. निवडणुका लांबणीवर टाकण्यासाठी आणि नागरिकांना त्यांच्या मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवण्यासाठी एक सुनियोजित कट रचला जात आहे. धोक्यात आलेली लोकशाही व्यवस्था, सातत्याने सुरू असलेला हिंसाचार यामुळे कुणीच बांगलादेशमध्ये गुंतवणूक करण्यास धजावत नाही. बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान पाकिस्तानी सैन्याने शरणागती पत्करली, तेव्हा दक्षिण आशियातील या नव्याने स्वतंत्र झालेल्या देशाची अर्थव्यवस्था वाईट स्थितीत होती. देशातील ८० टक्के लोकसंख्या अत्यंत गरिबीमध्ये जगत होती. त्यानंतर पुढील काही वर्षे बांगलादेश लष्करी उठाव, राजकीय संकट, गरिबी आणि दुष्काळाशी झुंजत राहिला. पाच वर्षांपूर्वी मात्र या देशाची परिस्थिती पूर्वीपेक्षा खूपच चांगली झाली होती. विकासवाटेवरील अग्रणी म्हणून बांगलादेशकडे पाहिले जात होते. त्याच्या विकासावर सर्वांच्या नजरा खिळल्या होत्या. बांगलादेशचा सामाजिक-आर्थिक विकास आणि लोकांच्या उत्पन्नात झालेली असाधारण वाढ पाहून जग थक्क होत होते. साथीच्या आजाराचा सामना करत असूनही बांगलादेशची अर्थव्यवस्था वेगाने रुळावर येत होती. बांगलादेश सुमारे १६७ दशलक्ष लोकसंख्येला पुरेल इतके अनधान्य पिकवतो. येथील माता आणि बालमृत्यू दरही लक्षणीयरीत्या कमी झाला होता. २०१५ मध्ये बांगलादेशने कमी-मध्यम उत्पन्न असलेल्या देशाचा दर्जा प्राप्त केला. तो संयुक्त राष्ट्रांच्या 'अल्प विकसित देशांच्या' यादीतून बाहेर पडण्याच्या मार्गावर होता. या देशातील ९८ टक्के मुलांनी प्राथमिक शिक्षण घेतले असून माध्यमिक शाळांमध्ये मुलांपेक्षा मुलींची संख्या जास्त आहे. अलिकडच्या काळात मुस्लिमबहुल राष्ट्राने मुली आणि महिलांचे जीवन सुधारण्यासाठी मोठी गुंतवणूक केली होती. बालकुपोषण आणि पुनरुत्पादक आरोग्याच्या मुद्यावरही त्यांनी प्रगती केली होती. मुलींच्या शिक्षणात सुधारणा झाल्यामुळे बांगलादेशची सामाजिक-आर्थिक रचना बदलली. मुली आणि महिलांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देणे हीदेखील एक येथे महत्त्वाची बाब ठरली. शेतीपासून उद्योगांपर्यंत बांगलादेश जगातील ३७ व्या क्रमांकाची सर्वांत मोठी अर्थव्यवस्था झाली होती. त्याचा जीडीपी ४०९ अब्ज डॉलर्सपेक्षा जास्त आहे. २०३० पर्यंत त्याची अर्थव्यवस्था दुप्पट होण्याचा अंदाज विविध संस्था व्यक्त करत होत्या; परंतु गेल्या वर्षी आरक्षणाचे निमित्त झाले आणि बांगलादेशला दिशा देणाऱ्या शेख हसीना यांना देश सोडून जावे लागले. त्यांच्या पक्षाचे अनेक नेते तुरुंगात आहेत. त्यांचा पक्ष मध्यममार्गी होता. कट्टरवाद्यांपेक्षा त्यांची विकासाची दृष्टी आणि धोरणे चांगली होती; परंतु अंतरिम सरकारच्या भूमिकेमुळे देश पुन्हा कट्टरवाद्यांच्या हाती गेला आणि त्याची प्रगतीकडून अधोगतीकडे वाटचाल सुरू झाली.

(लेखक राज्यशास्त्राचे प्राध्यापक आहेत.)

## वेध

**चंद्रकांत लोहाणा**

# हवामान बदल एक गंभीर संकट

विदर्भासह संपूर्ण राज्यामध्ये अवकाळी पावसाने थैमान घातले असून, शेतामधील उभी उन्हाळी पिके आडवी झाली आहेत. मे महिन्यामध्ये कडक उन्ह तापण्याऐवजी धो धो बरसणारा पाऊस भविष्यामध्ये येणाऱ्या धोक्याची घंटा तर वाजवत नाही ना अशी शंका घ्यायला बराच वाव आहे. निसर्ग असा बेताल व बेजबाबदार कसा झाला, याचा गंभीरतेने विचार करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. मागील काही वर्षांपासून बदलत्या हवामानामुळे राज्यामध्ये शेतकऱ्यांना प्रचंड नुकसान सोसावे लागले आहे. शेतांमध्ये वारेमाप वाढता रासायनिक खतांचा वापर व कीटकनाशकामुळे शेतजमिनीचा पोत अतिशय बिघडला आहे. रासायनिक द्रव्याच्या अतिवापराने भूगर्भातील पाण्याचे साठेही दूषित होण्यास सुरुवात झाली आहे. मानव जातीसाठी ही धोक्याची घंटा असून, वेळीच सावध झालो नाहीतर आपणास भविष्य कधीच माफ करणार नाही. त्यामुळे किमान वाढत्या तापमानावर व प्रदूषणावर आळा घालून निसर्गाचा बिघडलेला समतोल कसा राखला जाईल, हे बघणे सर्वाधिक महत्त्वाचे ठरेल.

अवेळी गारपीट आणि अकाली पाऊस बरसणे, हे निसर्गचक्र बिघडल्याचा परिणाम आहे. पन्नास वर्षे मागचा विचार करता आज तापमानामध्येही कमालीची वाढ झालेली दिसून येत आहे. त्यामुळे उन्हाळ्यामध्ये असह्य तापमानाचा सामना करावा लागतो. आम्ही विकासामधून विनाशाकडे तर चाललो नाही ना याचाही गंभीरतेने प्रत्येकाने विचार करावा. प्रदूषित हवामानाचा सामना शेतकऱ्यांसह सर्वच नागरिकांना करावा लागत आहे. त्यामुळे आरोग्यावरही घातक परिणाम होत असून, नवनवीन आजारांनी डोके वर काढले आहे. तापमानाच्या वाढीमुळे पृथ्वीवरील ऋतुचक्र आणि हवामानात फार मोठे बदल झाले आहेत. त्यामुळे कधी अति पाऊस, ढगफुटी, वादळे, महापूर, थंडी आणि उष्णतेची लाट व रोगराई अशा अनेक नैसर्गिक संकटांना मानवांना सामोरे जावे लागत आहे. निसर्गचक्राचा आपला एक नियम आहे. त्यामध्ये जर मानवाने ढवळाढवळ केली तर तो मानवास कधीच माफ करीत नाही आणि करणारही नाही. सुदैवाने आपणास तीन ऋतूंचे वरदान मिळाले आहे. जगातील अनेक देशांमध्ये फक्त पावसाळा आणि हिवाळा हे दोनच ऋतू आहेत. नैसर्गिकरीत्या मिळालेले हे भाग्य टिकविणे आमच्या हाती असूनही आम्ही त्याकडे सदैव डोळेझाक करीत आलो आहोत. त्यामुळे एक गंभीर संकट आमच्यासमोर येऊन ठेपले आहे.

संकटसमयी राज्य शासन जनतेच्या पाठीशी सदैव उभे राहते. परंतु, त्यालाही काही मर्यादा आहेत. दिलेल्या मदतीने ना सरकार समाधानी असते ना शेतकऱ्यांचे संपूर्ण नुकसान भरून निघते. मदत ही वरवरची मलमपट्टी असते. त्यामुळे समाधानाची परिपूर्तता कधीच होत नाही. राज्यामध्ये प्रदूषित झालेल्या निसर्गाचा सर्वाधिक फटका शेतकरी वर्गालाच बसत आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी या बाबीचा गंभीरतेने विचार करून त्याचा सामना करण्यासाठीही सज्ज झाले पाहिजे. भरघोस उत्पादनाच्या नादापायी सुरू असलेला रासायनिक खतांचा वापर बंद करून जैविक खतांकडे वळणे उपयुक्त ठरेल. जैविक खतांमुळे रासायनिक खतांवरील खर्च कमी होतो. जैविक खते नैसर्गिक आहेत. त्यामुळे जमिनीवर किंवा पिकांवर दुष्परिणाम होत नाही. रासायनिक खते व कीटकनाशकांच्या विक्रीने विदेशी कंपन्या गलेलठ्ठ झाल्या. परंतु, आज शेतकऱ्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. पूर्वी ग्राम संस्कृती शेतीला पूरक होती. वातावरणाला साजेशी होती. सर्वत्र जैविक खतांचा वापर असल्याने अन्न आणि भाजीपालाही कसदार होता. परंतु, बदलत्या काळानुसार सर्वकाही बदलल्याने आजमितीस शेती डबघाईस आली आहे.

पूर्वी प्रथम क्रमांकावर असणारा शेती हा व्यवसाय आज कनिष्ठ समजला जातो. नवीन पिढीच्या मनात शेतीबाबत असलेल्या अनास्थेपायी सुशिक्षित बेरोजगारांची फौज उभी झाली आहे. शेती सोडून शहरामध्ये लोंढे येऊ लागले आहेत. त्यामुळे वारेमाप सिमेंटचे जंगल शहरामध्ये निर्माण होत आहे. त्यासही आम्हीच जबाबदार आहोत. बदल स्वीकारताना आम्ही ते जसेच्या तसेच स्वीकारले. अनुकरण करणे हा मानवी स्वभाव असला तरी, तारतम्य बाळगूनच ते स्वीकारले पाहिजे. हे बदल स्वीकारताना आम्ही आमच्या संस्कृतीशी त्यांची सांगड घालण्याचा कधीच प्रयत्न केला नाही. त्यामुळे आम्ही हीन भावनेने एवढे ग्रस्त झालो आहोत का? पूर्वजांच्या परंपरा एवढ्या खालच्या दर्जाच्या आहेत का? या बाबीचा जर विचार केला तर निश्चितच उज्ज्वल भविष्याची एक चांगली पहाट उगवेल.

९८८१७१७८५६


## इतस्ततः

**दत्तात्रेय आंबुलकर**

# गड्या अपुला गाव बरा...

विविध राज्यांच्या ग्रामीण-दुर्गम व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या भागातून विविध महानगरे व औद्योगिक क्षेत्रांतील उद्योगांमध्ये रोजीरोटीद्वारा पोटाची खळगी भरून घर चालविण्यासाठी येणाऱ्या मेहनती व मोलमजुरी करणाऱ्या कामगारांची संख्या फार मोठ्या प्रमाणात असे. ही पद्धत पिढ्यान्‌पिढ्या चालू होती. मात्र, त्याला छेद बसला तो सुमारे पाच वर्षे आधीच्या म्हणजेच कोरोना महामारीच्या काळात. त्यानंतर ग्रामीण कुशल कामगार व त्यांचे शहरी उद्योगांमध्ये रोजगार-उपजीविकेसाठीचे स्थलांतर यामध्ये मोठे व परिणामकारक परिवर्तन घडून आले. याचा परिणाम त्यावेळी फार मोठ्या प्रमाणात मजुरांच्या स्थलांतरणात पाहायला मिळाला. मात्र, आज सुमारे पाच वर्षांनंतर जे परिणाम दिसून येतात, ते अनेक कार्यांनी विचारणीय ठरले आहेत, त्याचाच हा आढावा.

एक काळ असा होता की, उत्तर व पूर्वोत्तर भारतातील विविध राज्यांतील ग्रामीण व गरजू श्रमिक व मजूर लाखोंच्या संख्येत राजधानी दिल्ली, मुंबई, बंगळुरू, अहमदाबाद यांसारख्या महानगरांशिवाय सुरत, मालेगाव, पुणे, भिवंडी, सोलापूर यांसारख्या विविध उद्योगांसाठी प्रसिद्ध असणाऱ्या उद्योगांमध्ये रोजगारासाठी येत असत. त्यांच्या काम आणि कौशल्यांचा लाभ या उद्योगांना होत असे. कामगारांना रोजीरोटी लाभल्याने त्यांचा व त्यांच्या कुटुंबाचा निर्वाह होत असायचा. मात्र, कोरोनादरम्यान व त्यानंतर परिस्थितीमध्ये मोठे स्थित्यंतर घडून आले. कोरोना काळात लाखोंच्या संख्येत या स्थलांतरित कामगारांचे मूकपणे व अत्यंत शांततेने झालेले स्थलांतर अभ्यासकांसह अन्य देशांसाठी अभ्यास व उत्सुकतेचा विषय ठरले. त्याच काळात शासकीय स्तरावर विविध राज्य सरकारांसह केंद्र सरकारने स्थलांतरित कामगारांच्या समस्यांवर तातडीने उपाययोजना सुरू केली. याला मुख्यतः परिणामकारक साथ मिळाली ती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या 'प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजने'च्या यशस्वी अंमलबजावणीची. शहरी, निमशहरी क्षेत्रांसह विशेषतः ग्रामीण भागातील सर्वच गरिबांना या योजनेचा लाभ मिळाला. योजनेचे सकारात्मक परिणाम दिसू लागले. कोरोना काळापासून ग्रामीण गरिबांच्या पोटापाण्याचा प्रश्न खात्रीने सुटला. मात्र, यातून महानगरीय उद्योग व कंपन्यांपुढे काही आव्हाने देखील उभी ठाकली आहेत.



बांधकाम उद्योग व प्रकल्प व्यवस्थापन क्षेत्रातील प्रख्यात कंपनी असणाऱ्या लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनीचे एस. एस. सुब्रमण्यम यांच्या मते, आधी वर्षानुवर्षे गावातून येऊन महानगरांमधील वा औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या ग्रामीण-मजूर कारागिरांचा कल गेल्या काही वर्षांपासून पुरतेपणी बदललेला आहे. या ग्रामीण मजुरांचे कामकाज व रोजगारासाठी शहराकडे येण्याचे प्रमाण लक्षणीय स्वरूपात कमी झाले आहे. या बदलाचा सरळ परिणाम विशेषतः बांधकाम क्षेत्राच्या कामकाजावर सातत्याने होत असून त्यामुळे बांधकाम वा प्रकल्प व्यवस्थापनच नव्हे, तर उत्पादन क्षेत्रासह विविध उद्योगांवर त्यामुळे विपरीत परिणाम झाले आहेत. लार्सन ॲण्ड टुब्रो कंपनीच्या संदर्भात तपशील व आकडेवारीसह सांगायचे म्हणजे, कंपनीला त्यांच्या विविध प्रकल्प, उत्पादनकेंद्र व कार्यालय-आस्थापनांमध्ये दरवर्षी सुमारे चार लाख कामगारांची आवश्यकता असते. आधी म्हणजेच कोरोना काळापूर्वी एवढे कामगार मिळणे सहज शक्य होते. आता मात्र परिस्थितीत दुहेरी बदल झाला आहे. कंपनीचा व्यवसाय-व्याप वाढला आहे. मात्र, त्याचवेळी कंपनीला विशेषतः कौशल्यपूर्ण व अनुभवी कामगारांची कमतरता भासते. याचे मुख्य कारण म्हणजे, या कामगारांनी महानगरांमध्ये वा मोठ्या उद्योगांमध्ये काम करण्यापेक्षा आपल्या गाव-परिसर वा राज्यात काम करण्याला दिलेली पसंती!

एल ॲण्ड टी कंपनीमधील कामगारांची सद्य:स्थिती व त्यामुळे व्यवस्थापनापुढे निर्माण झालेली व्यावसायिक समस्या, ही केवळ एका कंपनी-व्यवस्थापनापुढची नसून ती प्रातिनिधिक स्वरूपाची आहे. मूलभूत सुधारणा व बांधकाम आणि प्रकल्प उभारणीपासून अगदी हिरे निर्मिती क्षेत्रापर्यंतच्या सर्वच उद्योग-समूहांना सध्या कुशल-कामगारांच्या कमतरतेच्या समस्येने पुरतेपणी ग्रासले आहे. विविध स्तरावर कर्मचाऱ्यांची निवड करून पुरवठा करणाऱ्या 'टीमलीज' या मानव-संसाधन व्यवस्थापन कंपनीतर्फे नव्यानेच प्रकाशित केलेल्या राष्ट्रीय स्तरावरील अहवालानुसार, भारताला सद्यस्थितीत सुमारे १३ कोटी कामगारांची आवश्यकता आहे. २०२० साली म्हणजेच कोरोनापूर्व काळात कामगारांच्या कमतरतेची हीच आकडेवारी १३.८ कोटी होती, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. या प्रकरणीची पृष्ठभूमी म्हणजे, २०२० साली जाहीर झालेल्या कोरोना निर्बंधांनंतर त्याचे उद्योग-व्यवसाय क्षेत्रात कॉर्पोरेट क्षेत्र-उत्पादन उद्योगांवर जे व्यापक परिणाम झाले, त्याच्याच परिणामी रोजंदारीवर बदली म्हणून काम करणाऱ्या श्रमिक कामगारांना आपल्या गावची वाट धरावी लागली. २०२० साली अझीम प्रेमजी विद्यापीठातर्फे करण्यात आलेल्या सर्वेक्षणात नमूद केल्यानुसार, कोरोनाच्या निर्बंधामुळे ग्रामीण कामगारांवर झालेले परिणाम अद्याप दिसून येत आहेत. २०२३-२४ साली उपलब्ध आकडेवारीनुसार, परंपरागत स्वरूपात भारतातील महानगरांसह मोठ्या उद्योगांमध्ये वर्षानुवर्षे काम करणारे ग्रामीण व अनुभवी कामगार ही बाब कोरोनासोबतच इतिहासजमा झाली. त्याचदरम्यान गावी गेलेल्या कामगारांनी कोरोनाच्या जीवघेण्या अनुभवानंतर आपल्या गाव-परिसर वा राज्यातील रोजगारांना मोठ्या प्रमाणावर प्राधान्य देण्यास सुरुवात केली. भारताचे निवृत्त मुख्य संख्याशास्त्रज्ञ प्रणव सेन यांच्यानुसार, २०११ सालच्या जनगणनेनुसार भारतातील स्थलांतरित कामगारांचे असणारे ३६.६ टक्के प्रमाण कोरोनानंतर २०२३ साली २८.९ टक्क्यांवर येणे अनेकांसाठी चिंतनीय ठरले. यासंदर्भात त्यानंतर करण्यात आलेल्या सर्वेक्षणांनुसार, ऑगस्ट २०२३ ते जुलै २०२४ या कालावधीत ग्रामीण भागातील दरडोई उत्पन्न ९.२ टक्के वाढून त्यांचे मासिक उत्पन्न दरमहा ४ हजार १२२ रुपये झाले, तर त्याचदरम्यान शहरी क्षेत्रातील दरडोई उत्पन्न ८.३ टक्के व मासिक उत्पन्न ६ हजार ९९६ रुपये आढळून आले. अझीम प्रेमजी विद्यापीठातील अर्थशास्त्रज्ञ प्रा. अमित बसोले यांच्यानुसार, ग्रामीण भागातील कामगारांची कामकाजासाठी शहरांकडे धाव घेण्याची प्रवृत्ती कमी होत जाणार आहे. अपवाद फक्त अधिक आकर्षक वेतनमान व फायदे देणाऱ्या उद्योगांचाच असेल. मात्र, सर्वसाधारण कुशल कामगार आपल्या परिसरातील रोजगारांनाच पसंती देतील, असे चित्र आहे.


(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## वाचक पत्रे

### मुलींनाही उच्च शिक्षणाची संधी मिळावी

दहावी आणि बारावी परीक्षेत यावर्षीही मुलींनी चमकदार कामगिरी करत बाजी मारली. मुलींची शैक्षणिक कामगिरी उत्तम असली, तरी आजही त्यांच्या शिक्षणाकडे गांभीर्याने पाहिले जात नाही. ग्रामीण भागात आजही दहावी, बारावीनंतर मुलींचा विवाह लावला जातो. मुलींना



उच्च शिक्षण घेऊ दिले जात नाही. मुलींपेक्षा मुलांच्या शिक्षणाकडे पालकांचा कल अधिक असतो. मुलांना शिकण्याची पूर्ण संधी देऊन त्यांच्या शिक्षणासाठी अधिक साधने उपलब्ध करून दिली जातात. उत्तीर्ण झालेल्या सर्व मुलींना शिक्षणाची संधी मिळायला हवी. शहरी, ग्रामीण भागातील मुलींनाही संधी मिळावी यासाठी सरकारने प्रयत्न करायला हवेत. त्याचा महिलांच्या सबलीकरणासह समाजाच्या प्रगतीशीही थेट संबंध आहे. म्हणूनच ही जबाबदारी पालक, समाज आणि सरकारने घ्यायला हवी.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### जनसामान्यांचा तरुण भारत

तरुण भारत वृत्तपत्र आपल्या प्रकाशनाची १०० वर्षे पूर्ण करण्याच्या दिशेने यशस्वी वाटचाल करत आहे, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. अलिकडेच वृत्तपत्राच्या वाढलेल्या पानांमुळे आम्हाला अधिक सखोल, विविध आणि दर्जेदार माहिती मिळत आहे. आजच्या घडीला प्रत्येक घडामोडीवर सविस्तर लेख, अभ्यासपूर्ण विश्लेषण आणि माहितीपूर्ण वृत्ते मिळणे ही खरोखरच वाचकांसाठी अमूल्य भेट ठरत आहे. तरुण भारतने ही गरज ओळखून नवनवीन विषय, क्षेत्र आणि घटना यांचा समावेश वृत्तपत्रात केला आहे. यामुळे आमच्यासारख्या वाचकांची वाचनाची आवड अधिकच वाढली आहे. शोध पत्रकारिता करत प्रशासनातील उणिवा चव्हाट्यावर आणल्या, त्याच प्रकारे सकारात्मक पत्रकारितेतून प्रशासनाची चांगली कामे लोकांसमोर आणली. आपला वर्तमानपत्राचा खरा गुण गुणधर्म कधी सोडून व्यावसायिकतेचा गुणधर्म आपल्या अंगी बाळगला नाही, कधी कुणासमोर झुकला नाही.

आपल्या जिद्दीच्या जोरावर, सत्याच्या पाठपुराव्यात कोणतीही तडजोड न करता तरुण भारतने विश्वासार्ह पत्रकारितेचा पाया रचला. आजही तेवढ्याच ताकदीने आणि निष्ठेने समाजातील घडामोडींवर प्रकाश टाकत आहे. या प्रवासात अनेक संपादक, पत्रकार आणि सहकाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतली आहे. त्यांच्या अथक परिश्रमामुळे तरुण भारत केवळ एक वृत्तपत्र न राहता, तो समाजाच्या मनाचा आरसा बनला आहे. विशेषतः सत्य आणि पारदर्शकतेचा आग्रह धरून, निर्भीड पत्रकारिता करण्याच्या भूमिकेमुळे तरुण भारतने समाजमनावर वेगळा ठसा उमटवला आहे. वर्तमानपत्र केवळ वर्तमानकाळात घडणाऱ्या घटनांचे प्रतिबिंब नसते, तर ते समाजाच्या भविष्यासाठी एक दिशा ठरवत असते. तरुण भारतने सदैव सामाजिक प्रश्नांना वाचा फोडली, सामान्य जनतेच्या हितासाठी लढा दिला आणि लोकशाहीच्या मजबूत पर्वाची सुरुवात केली. शतकपूर्तीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या तरुण भारतला मन:पूर्वक शुभेच्छा!

**कल्पना सगदेव**/९१७२३२१६५१

### चिंतनशील विचारपुष्प

तरुण भारतमधील काही दिवसांपूर्वी नव्याने सुरू झालेले 'विचारपुष्प' अतिशय प्रेरणा देणारे आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील महनीय व्यक्तींचे विचार यात प्रकाशित होतात. सकाळचा एक सकारात्मक विचार दिवस बदलू शकतो आणि असा एक एक दिवस जीवनात परिवर्तन घडवू शकतो हे निश्चित. केवळ चार-पाच ओळी पण या ओळीत प्रचंड सामर्थ्य आहे. पाहिले विचार मनात येतो आणि त्यातून कृती घडते आणि ध्येय साध्य होते. हा एक विचारच अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रार्थना का केली पाहिजे. हा एक प्रश्न किती अनमोल आहे. प्रार्थनेत फार मोठी ताकद आहे. प्रार्थना आपल्या जीवनाची प्रेरणा स्पष्ट करते. प्रयत्नांची दिशा निश्चित करते. विकासाची भूमिका आणि मर्यादा ध्यानात आणून देते. प्रतिकूल परिस्थितीमध्येही धैर्य आणि उत्साह निर्माण करते. जीवनाला दिशा देण्याची आणि संपूर्ण जीवनाला गतिशील ठेवण्याची क्षमता प्रार्थनेत आहे. संघ कार्यासाठी, कार्यकर्त्यांची विकास प्रक्रिया आणि समर्पणातून काय प्राप्त केले पाहिजे याची स्पष्ट दिशा दाखवणारा शब्द समूह म्हणजे प्रार्थना होय. सुरेशराव केतकर यांनी ही जाणीव मनामनात पेरली. कोणत्याही कार्याचा प्रारंभ प्रार्थनेने केला असता प्रत्यक्ष भगवंत आपल्या सोबत राहतो. प्रार्थनेत श्रद्धा, विश्वास आणि आर्तता देखील हवी तेव्हाच ती परमेश्वरापर्यंत सहज पोहचते आणि मग यशाच्या शिखरावर विराजमान होता येते, हा आनंद एक समाधान देणारा आहे हे निश्चित.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस tbedit2016@gmail.com

तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.

प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87

stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त

### बस स्थानकातून महिलेच्या गळ्यातील दागिने लंपास ; चोर वाटातुन चोरटे फरार

**तभा वृत्तसेवा**
**मंठा /प्रतिनिधी**

मंठा शहरातील बस स्थानक परिसरात दागिने चोरट्यांची टोळी सक्रिय झाली आहे. बस स्थानकातून अधून मधून महिलेच्या गळ्यातील दागिने लंपास तर पुरुषांचे पैशाचे पाकीट लंपास केल्याच्या घटना घडत आहेत. यात तारीख २६ सोमवार रोजी अकरा वाजेच्या सुमारास एका साठ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोन्याची पोत अज्ञात चोरट्यांनी गर्दीचा फायदा घेत लंपास केली. याप्रकरणी मंठा पोलीस ठाण्यात रुक्मिणी विठ्ठल कांबळे राहणार आकणी या महिलेच्या फिर्यादी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी अधिक तपास पोलीस करत आहेत. मंठा बस स्थानकामध्ये प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कुठलीच उपायोजना केलेली दिसून येत नाही. बस स्थानकामध्ये कंपाउंड पाडून अनेक ठिकाणी चोर रस्ते करण्यात आले आहेत. यासह या परिसरामध्ये सुरक्षा गार्ड नसून सीसीटीव्ही कॅमेरे देखील नसल्याने चोऱ्यांसह बेकायदेशीर कत्त्याचे प्रमाण वाढत आहे.

### परतूर ग्रामीण रुग्णालयात डायलीसिस सुविधा द्यावी - अर्जुन पाडेवार

**तभा वृत्तसेवा**
**परतूर / प्रतिनिधी**



परतूर येथील उपजिल्हारुग्णालयात गोर-गरीब रुग्णांसाठी डायलीसिस सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अर्जुन पाडेवार यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

यासंदर्भात पाडेवार यांनी ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ दुर्गावाड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की तालुका सह शहर परिसरात मूत्रपिंडाचे अनेक रुग्ण आहेत. यातील अनेक रुग्ण अतिशय हलाखीच्या परिस्थितीत जीवन जगत आहेत. बिकट आर्थिक परिस्थितीमुळे ते जालना, छत्रपती संभाजीनगर किंवा मुंबई इतर ठिकाणी जाऊन उपचार घेऊ शकत नाही. ही बाब लक्षात घेता शहरातील उपजिल्हारुग्णालयात डायलीसिस सुविधा उपलब्ध करून देण्याची गरज आहे. तसेच या ठिकाणी महात्मा फुले जन आरोग्य योजना आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे सेंटर ही या ठिकाणी उभारावे जेणेकरून पुर्ण उपचार गोरगरीब जनतेला मोफत घेण्यात येईल तसेच आपण यासाठी वरिष्ठ पातळीवार देखील प्रयत्न करणार असल्याचे पाडेवार म्हटले आहे, दिलेल्या निवेदनावर पाडेवार यांची स्वाक्षरी आहे.

### भोकरदन शहरात नेत्यांच्या उदासीन धोरणामुळे पाणीबाणी परिस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन / प्रतिनिधी**

दानापूर येथील जुई धरणातून भोकरदन शहराला जवळपास सन १९९२ मध्ये झालेली पाईपलाईन योजना आज अनेक ठिकाणी पाईप लाईन झाली होती, परंतू ती पाइपलाइन अनेक ठिकाणीं जीर्ण झाली असून ठिकठिकाणी गळती लागली आहे,



दरम्यान ही पाइपलाइला एका ठिकाणी दुरुस्ती केली तर परत दुसऱ्या ठिकाणी पाईप गळती सुरु होते हे चक्र सतत चालू असल्यामुळे त्याचा परिणाम शहाराच्या पाणी पुरावठयावर होतं आहे आजच्या परिस्थिती मध्ये ३० हजारापेक्षा जास्त लोकसंख्या शहरांची झालली असून अनेक खेड्यापाड्यातून लोकं भोकरदन शहरात नोकरी निमित्त शिक्षणा निमित्ताने राहायला येतं असून अश्या परिस्थिती मध्ये लोकसंख्या दर वाढत असून पाण्याचा प्रश्न मात्र बिकट होतं चालेला आहे. नवीन योजना राजकीय महत्वकांशा व श्रेयवादा मध्ये अडकून पडली असून त्यावर न बोलले अशी परिस्थिती सत्ताधारी व विरोधकानी करुन ठेवली आहे, आज शहराला पाणीपुरवठा करणारी पाईप लाईनला अनेक ठिकाणी गळती लागल्याने त्यामुळे भोकरदन शहराला पाणी पुरवठा सुरळीत होतं नाही त्यामुळे सामान्य नागरिकांना टँकर ने पाणी पुरवठा करुन आर्थिक बोजा सहन करावा लागत आहे गरीब नागरिकांना विहिरीवरून पाणी काढून आणावे लागत आहे तरी हयाची दखल घेऊन पाईप लाईन गळती शून्य टक्यावर आणण्या साठी प्रभावी कायमस्वरूपी उपाय योजना राबवावी जणेकरून शहराला निदान एक दिवस आड पाणी पुरवठा करता येईल हयावर प्रभावी उपाय योजना राबवाव्या नसता नगरपरिषद कार्यलावर नागरिकांच्या वतीने तीव्र अंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला असून या या निवेदनावर विकास जाधव,बबलू शेख, लहू सिरसाठ,समीर शहा, जावेद शहा, फरहाण शेख, पवन गायकवाड, अनिल ठाकूर, मुसेफ शहा यांच्या स्वाक्षऱ्या आहे .

# पांजरापोळ येथे गौशाळा संचालकाच्या जिल्हास्तरीय कार्यशाळेला प्रतिसाद

## गौशाळा महासंघाचे संयोजक डॉ. सुनील सुर्यवंशी यांनी विविध विषयावर केले मार्गदर्शन




तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

श्री गोरक्षण पांजरापोळ गोशाळेत गौशाळा संचालकांची जिल्हास्तरीय कार्यशाळा रविवारी (ता. २५) उत्साहात पार पडली असून, त्या उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.अध्यक्षस्थानी पांजरापोळ गोशाळेचे अध्यक्ष घनश्यामदास गोयल हे होते. गौशाळा महासंघाचे संयोजक डॉ. सुनील सुर्यवंशी, पांजरापोळ गोशाळेचे सचिव कैलास बियाणी, कोषाध्यक्ष विजय कामड, विश्वस्त महेंद्र भक्कड, विजय राठी, संजय लाहोटी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेत गौशाळा महासंघाचे संयोजक डॉ. सुनील सुर्यवंशी यांनी गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना, परिपोषण योजना, गाईंच्या आरोग्याची काळजी, महाराष्ट्र शासनाकडून मिळणारे अनुदान कसे खर्च करावे, खर्चाची देयके, माहिती पाठवणे, अनुदान मिळण्यासाठी अर्ज कसे करावे, गौशाळा महासंघाचे कार्य आदींबाबत सविस्तर माहिती दिली. घनश्यामदास गोयल यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रास्ताविक सचिव कैलास बियाणी यांनी केले तर सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन कोषाध्यक्ष विजय कामड यांनी केले. कार्यशाळेत विलास तांगडे, उध्दव घुमरे, बन्सीधर आटोळे, गंगाधर सुरवसे, हरिश्चंद्र सूकोसे, गजानन घोडके, विवेक गाढे, विश्वनाथ घोडके, विष्णुकुमार चेचाणी, विजय बोडले, श्रीराम राठोड, भागवत डोंगरे, किसन बरडे, विष्णू आनंदे, भगवान उगले, भरत भांदरगे, रवींद्र मदने, आरगडे यांच्यासह जिल्ह्यातील ४० गौशाळा संचालकांनी सहभाग नोंदवला.

### सवासणी येथे स्मशानभूमीसाठी जागा द्या नसता संबंधित प्रशासनाच्या समोरच अंत्यसंस्कार होणार ग्रामस्थाचां आक्रमक पवित्रा

तभा वृत्तसेवा
जाफ्राबाद / प्रतिनिधी

माळी, वाणी,तेली, न्हावी, देशमुख, सुतार,धोबी,या सातही समाजाला मरणानंतरही सोसाव्या लागतात यातना, दुर्गंधीयुक्त नदीच्या पुलाखाली नाल्यात व रस्त्यावर करावा लागतो अंत्यसंस्कार जाफ्राबाद तालुक्यातील सवासणी हे गाव मुळातच समस्या ग्रस्त असल्याने ग्रामस्थांना अनेक संकटांचा सामना करावा लागत आहे. गावात एक हि सार्वजनिक स्मशानभूमी नसल्याने माळी समाजासह इतर समाजातील नागरीकांना संकटांचा सामना करावा लागत आहे.मिळेल त्या ठिकाणी तुटपुंज्या जागेत भर रस्त्यावर व नदीनाल्यावर चिखल माती तुडवित अंत्यसंस्कार हे माळी,वाणी,तेली, न्हावी,सुतार,



धोबी, देशमुख,या सातही समाजातील नागरीकांना सामना करावा लागत आहे.भर पावसाळ्यात हि उघड्यावर अंत्यसंस्कार करण्यात येत असुन प्रेत जळतांना ग्रामस्थांना पावसाचा संकटकालीन सामना करावा लागत आहे. दुर्गंधीयुक्त नदी नाल्यात प्रेत घेऊन जाण्यासाठी ना धड रस्ता ना कुठलीच व्यवस्था अंत्यसंस्कार करणाऱ्या ठिकाणी वरती ना टिनशेड पावसाळ्यात हि नदी नाल्यात ऊतरणेही होते जिव घेणे पाऊस पडल्याने अनेकांना राखेवर हात पडणे ही होतेय मुश्किल राजकीय लोकप्रतिनिधी, कार्यकर्ते, समाजाची घेतेय बघ्याची भूमिका येणाऱ्या काळात स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी न लावल्यास ग्रामस्थ थेट तहसील कार्यालय, जिल्हा अधिकारी कार्यालय, पोलिस स्टेशन,ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी प्रेत घेऊनच अंत्यसंस्कार करण्याचा इशारा संतप्त नागरिकांतून होतोय या भागातील किमान आमदार,खासदार,या ठिकाणचा स्मशानभूमीचा प्रश्न मार्गी लावणार का ? कि बघ्याची भूमिका घेणार हे पाहणेही येणाऱ्या काळात दिसुन येईलच मात्र राजकीय पुढारी यांना ना समाजाचे कुठलेच सोयरसुतक पडत नसल्याने जनता जाय भाड में म्हणने वावगे ठरणार नाही अनेक जण फक्त बघ्याची भूमिका घेतात .

# विजेच्या प्रश्नावर आमदार खोतकर आक्रमक महावितरणच्या अधिकाऱ्यांची बैठकीत केली झाडाझडती

### वीज पुरवठा सुरळीत करण्याच्या सुचणा : आ.अर्जुनराव खोतकर

**तभा वृत्तसेवा**
**जालना / प्रतिनिधी**

जालना शहरासह ग्रामीण भागात विजेची समस्या गंभीर बनली असून या संदर्भात असंख्य नागरिकांच्या तक्रारी आमदार खोतकर यांच्याकडे प्राप्त झाल्या होत्या. नागरिकांच्या तक्रारीची दखल घेऊन आमदार खोतकर यांनी थेट महावितरण कार्यालय गाठले व अधीक्षक अभियंता कार्यालयामध्ये सबंधीत सर्व महावितरणच्या अधिकाऱ्यांची बैठक घेऊन अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले व जालना शहरासह जिल्हाभरातील वीज पुरवठा तातडीने सुरळीत करा व जनतेला विजेच्या समस्यापासून त्रास होणार नाही याची काळजी घ्या अशा स्वरूपाच्या सूचना उपस्थित महावितरणच्या अधिकाऱ्यांना दिल्या. व अधिकाऱ्यांची चांगली झाडाझडती घेतली. आमदार खोतकर यांनी अधिकाऱ्यांवर एक प्रकारे विजेच्या समस्या संदर्भात प्रश्नांची चांगली सरबत्ती केली .त्यामुळे अधिकाऱ्यांची भांबेरी ऊडली. पुढे बोलताना खोतकर म्हणाले की शहरास ग्रामीण भागामध्ये विजेच्या तारा लोंबकळलेल्या आहेत वारंवार दुरुस्ती करून देखील विजेची समस्या का सुटत नाही ?वारंवारित पुरवठा खंडित होण्याची कारणे काय? त्यावर तातडीने उपाययोजना का होत नाहीत ?निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्या एजन्सीला काळ्या यादी का टाकले जात नाही,,? मर्जीतल्या लोकांनाच कामे दिले जातात. या संदर्भात जॉब विचारला .असे बोगस काम करणाऱ्या एजन्सीला काळ्या यादी टाका व त्यांच्यावर जबाबदारी फिक्स करा. अनेक ठिकाणी उघड्यावर रोहित्रे दिसतात त्यामुळे अपघात होतात. ज्या भागात महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा होतो त्याच भागात वीज खंडित होण्याचे प्रमाण देखील शहरांमध्ये आढळून येते. याकडे देखील लक्ष वेधले आहे जालना शहरात अनेक ठिकाणी रहदारीच्या मार्गावरच विजेची खांबे आहेत वारंवार सूचना करूनही हटविले जात नाहीत. यामुळे अपघात होतात या संदर्भात तातडीने कारवाई करण्याच्या सूचना देखील



आमदार खोतकर यांनी केल्या. तसेच वीजबिला संदर्भात अनेक तक्रारी असून आवाची सव्वा बिले ग्राहकांना दिले जातात, तक्रार करून देखील वेळेवर वीज बिलाची दुरुस्ती होत नाही त्यामुळे नागरिकांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागते. यामध्ये तातडीने सुसूत्रता आणावी दिरंगाई व काम चुकवेगिरी करणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई करावी वरील सर्व उपाययोजना तातडीने करण्यात याव्यात व वीजपुरवठा सुरळीत करावा. जनतेला होणारा त्रास कमी करा अन्यथा तुमच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल व अधिकाऱ्यांची शासनाकडे तक्रार केली जाईल असा सज्जड दम ही उपस्थित अधिकारी कर्मचाऱ्यांना आमदार खोतकर यांनी दिला. या बैठकीस जिल्हा संपर्क नेते पंडितराव भुतेकर , जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शहर प्रमुख विष्णू पाचफुले गणेश मोहिते युवासेना उपजिल्हाप्रमुख वसंत राजे जाधव ज्येष्ठ शिवसैनिक यांच्यासह अधीक्षक अभियंता संजय सरग, कार्यकारी अभियंता, शहर अभियंता अधिकार, शाखा अभियंता संजय गहाणे ,शाखा अभियंता नागरे, व महावितरण चे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

# पात्र घरकुलधारकांना प्रत्येकी पाच ब्रास रेती मोफत देण्यात येणार: आ.कुचे

तभा वृत्तसेवा
अंबड /प्रतिनिधी

दि २६मे माननीय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आदेशानुसार तसेच महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय दिनांक ८ एप्रिल २०२५ व ३० एप्रिल २०२५ अन्वये माननीय जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली अंबड तालुक्यातील पात्र घरकुलधारकांना पाच ब्रास रेती मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे पात्र लाभार्थी यांनी तलाठी ग्रामसेवक यांच्यामार्फत किंवा स्वतःही स्वतःचा आधार क्रमांक मोबाईल क्रमांक व घरकुल मंजुरीची यादी चा क्रमांक अपलोड केल्यानंतर सदरील पात्र लाभार्थ्यांना तहसीलमार्फत मोफत ई पास देण्यात येणार आहे आणि त्यांनी त्यांना असलेल्या नजीकच्या वाळूघाटापासून पसंती क्रमांक दिल्यास त्या वाळू घाटावरून त्यांची ओळख पटवून त्यांना पाच ब्रास रेती मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे अंबड तालुक्यात जवळपास पंधरा हजार पाचशे लाभार्थी असून त्यांच्या याद्या गावनिहाय तलाठी, मंडळ अधिकारी ग्रामसेवक यांना देण्यात आलेले आहेत. त्याचबरोबर त्यांच्याकडून अर्ज भरून घेण्याकरता गटविकास अधिकारी यांच्यामार्फत ग्रामसेवक यांना सांगण्यात आलेले आहे. तलाठी, मंडळ अधिकारी यांची बैठक घेऊन पात्र लाभार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरता चे सर्व माहिती इत्यंभूतपणे देण्यात आलेली आहे सदर योजना ही १० जून २०२५ पर्यंत असल्याने सर्व पात्र लाभार्थ्यांनी आपले वाहन व भरण्याकरता साहित्य घेऊन मंजुरी झाल्यानंतर रेती उपलब्ध करून घ्यायची आहे.सदर योजनेचा जास्तीत जास्त लोकांनी लाभ घ्यावा याविषयी आवाहन करण्यात येते.

त्याचबरोबर शासकीय यंत्रणांना शासकीय कामांना रेतीची मागणी झाल्या नुसार बारा हजार आठशे ब्रास रेती त्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे अंबड तालुक्यातील १० रेती घाटावरून सदरची रेती उपलब्ध करून देण्यात येणार असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात येत आहे... उपरोक्त संदर्भ अन्वये माननीय नारायण कुचे विधानसभा सदस्य बदनापूर यांनी उपस्थिती लावून उपरोक्त शासन निर्णयानुसार पात्र घरकुलधारकांना मोफत पाच प्रास रेती देण्यात येणार असून सदर योजनेचा जास्तीत जास्त लोकांनी फायदा घ्यावा असे आवाहन केले त्याचबरोबर उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी तथा सरपंच यांना सुद्धा सविस्तर मार्गदर्शन केले सदर



वेळी तहसीलदार विजय चव्हाण, गटविकास अधिकारी उदय राजपूत, मुख्याधिकारी उकिरडे मनोज, नायब तहसीलदार विश्वास धर्माधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता दगुला व इतर प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते .

# उसाच्या दरात यंदाही 'समृद्धी' चा दर वरचढच !

**तभा वृत्तसेवा**
**अंबड / प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना २९७० रूपये एफआरपी देण्याची कारखान्याची घोषणा २०० रुपयांचा दुसरा हप्ता लवकरच खात्यात होणार जमा : चेअरमन सतीश घाटगे अंबड घनसावंगी: शेतकऱ्यांच्या उसाला उच्चांकी दर देणारा साखर कारखाना म्हणून मराठवाड्यात ओळख निर्माण केलेल्या समृद्धी साखर कारखान्याने यंदाही उच्चांकी भावाची परंपरा कायम ठेवली आहे. गाळप हंगाम २०२४ -२५ मध्ये गाळप झालेल्या शेतकऱ्यांच्या उसाला २९७० रुपये प्रती मे. टन प्रमाणे दर देण्याची घोषणा कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे पाटील व व्हाईस चेअरमन महेंद्र मेठी यांनी सोमवारी (दि. २६) केली. या घोषणेमुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामात मोठी मदत होणार असल्याने शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. अंबड -घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या उसाला योग्य मोबदला देण्यात समृद्धी साखर कारखाना मराठवाड्यात आघाडीवर राहत आला आहे. गळीत हंगाम २०२२-२३ मध्ये समृद्धी कारखान्याने गाळप झालेल्या शेतकऱ्यांच्या उसाला एफआरपी पेक्षा ११० रुपये अधिक भाव देत २ हजार ८०० रुपये प्रतीटन प्रमाणे अंतिम बिल दिले. तर गाळप हंगाम २०२३-२४ मध्ये देखील समृद्धी साखर कारखान्यात गाळप झालेल्या



उसाला उच्चांकी दिला आहे. आता गाळप गाळप हंगाम २०२४ -२५ मध्ये गाळप झालेल्या उसाला २९७० रुपये प्रती मे. टन भाव देण्याची घोषणा केली आहे. पहिला हप्ता २५०० रुपये प्रती मे. टन प्रमाणे दिल्यानंतर लगेच दुसरा हप्ता २०० रुपये प्रती मे. टन प्रमाणे देण्यात येणारी असल्याची माहिती समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी दिली आहे. दुसऱ्या हप्त्याची रक्कम वाटप झाल्यांनतर तिसरा हप्ता देखील लवकर शेतकऱ्यांना देण्यात असल्याचे सतीश घाटगे यांनी सांगितले आहे. गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये थेट २९७० रुपये प्रति मे. टन दराने एफआरपीची घोषणा करत समृद्धी कारखान्याने पुन्हा एकदा 'उस दर युद्धात' बाजी मारली असून दोन हंगामांप्रमाणेच यंदाही इतर कारखान्यांपेक्षा अधिक दर देत 'उस दर स्पर्धेत' आपले वर्चस्व कायम ठेवले आहे.

> लवकरच २०० रुपये प्रति मे. टन प्रमाणे दुसरा हप्ता जमा करणार - समृद्धी साखर कारखाना हा सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या विश्वासावर उभा असून सर्वसामान्य शेतकऱ्यांचा कारखाना म्हणूनच तो चालविल्या जातो. याचा आम्हाला अभिमान आहे. गाळप हंगाम २०२४-२५ मध्येही शेतकऱ्यांच्या उसाला २९७० रुपये प्रती मे. टन दर देऊन शेतकऱ्यांचा विश्वास जपला आहे.पहिला हप्ता २५०० रुपये प्रती मेट्रिक टन प्रमाणे अदा केला आहे. लवकरच २०० रुपये प्रति मे. टन प्रमाणे दुसरा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे.
>
> **-सतीश घाटगे,**
> **चेअरमन समृद्धी साखर कारखाना**

# महावितरणमध्ये बेशरम व कंदीलाचे तोरण बांधून मराठा महासंघाचे लक्षवेधी आंदोलन

## जनतेला अंधारात ठेवणाऱ्यांना आता जागे केल्याशिवाय राहणार नाही - अरविंद देशमुख

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून पाऊस असो की नसो खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे जालना शहर व परिसरातील नागरिकांची झोप उडाली असून, त्यांना मरणयातना सहन कराव्या लागत आहेत. शिवसेनेच्या दोन्ही गटांनी महावितरणला निवेदने दिली, मात्र, अधिकाऱ्यांच्या डोक्यात प्रकाश पडलाच नाही. विजेचे रडगाणे सुरूच असल्याने हतबल झालेल्या नागरिकांच्या व्यथा आणि संतापाला आवाज देत मराठा महासंघाने जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वात आज सोमवार दि. २६ मे रोजी आक्रमक भूमिका घेऊन महावितरणच्या कार्यकारी अभियंत्याच्या कार्यालयाला 'कंदील व बेशरमाच्या पानाचे तोरण' बांधून निष्क्रियतेचा निषेध नोंदवला. घोषणाबाजीसह अचानक झालेल्या या लक्षवेधी आंदोलनामुळे महावितरणचे प्रशासन हादरून गेले.

जालना शहर व परिसरातील वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत झाला आहे. २१ मे रोजी रात्री ९ पासून तब्बल अडीच वाजेपर्यंत संपूर्ण शहर अंधारात होते, तर त्याआधी तब्बल २० तास वीजपुरवठा खंडित होता. त्यानंतरही दिवस रात्र खंडित वीज विजपुरवठ्याचा खेळ सुरू असल्यामुळे मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखाली कोषाध्यक्ष



अशोक पडुळ, उपाध्यक्ष सुभाष चव्हाण मंगेश मोरे, सागर पाटील, अर्जुन गायकवाड, श्रीधर पोथरे, योगेश सोळंके, दत्ता गव्हाणे, यश जाधव, सुहास मुंडे यांच्यासह कार्यकर्त्यांनी महावितरणचे कार्यालय गाठले आणि निदर्शने करत कार्यकारी अभियंत्याच्या कार्यालयाला बिसरामाची पाने व कंदीलाचे तोरण लावले. याप्रसंगी बेशरमाचे पाने व कंदीलाचा गुच्छ कार्यकारी अभियंता देण्यात आला. अचानक झालेले हे आंदोलन केवळ लक्षवेधी नव्हे, तर प्रशासनाला हादरवणारे ठरले. आंदोलनाचे गांभीरे ओळखून पोलीस तात्काळ दाखल झाले. जिल्हा विशेष शाखेचे मुकेश पट्टे, सय्यद शौकत आणि पोलीस कर्मचारी परिस्थितीवर लक्ष ठेवून होते.

यावेळी अरविंद देशमुख यांनी कार्यकारी अभियंत्यास खडेबोल सुनावले. जनतेला अंधारात ठेवणाऱ्यांना आता जागं केल्याशिवाय राहणार नाही, असे ते म्हणाले. महावितरणच्या गलथानपणामुळे जालना अंधारात बुडालं आहे. ही लाजिरवाणी बाब असून, नागरिकांचा अंत पाहू नका. वेळेत दुरुस्ती, झाडांची छाटणी न करता तुम्ही जनतेला त्रास देत आहात. आता आमचा संयम सुटला आहे. परिस्थिती सुधारली नाही, तर रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडू. मग जबाबदार कोण, हे जनता ठरवेल, अशा संतप्त शब्दांत अरविंद देशमुख यांनी इशारा दिला.

### हिवराबळी येथे वादळी वाऱ्याने २ सोलर पॅनलचे नुकसान

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद / प्रतिनिधी**

जाफराबाद तालुक्यात वादळी वाऱ्यास अवकाळी पावसाने शेतकऱ्यांच्या शेतातील सोलार पंप चे नुकसान झाले आहे जाफराबाद तालुक्यातील हिवराबळी येथील शेतकरी गजानन शेनफड लोखंडे गट नंबर २२० यांच्या पाच एचपी सोलार पंप हे वादळी वाऱ्याने व पावसाने नुकसान झाले आहे. संपूर्ण उन्हाळ्यात पाऊस सुरू असल्याने शेतकऱ्यांचे ताळमेळ उडाली असतानाच आता असे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याने शेतकरी पंचनामाचे मागणी करीत आहे.



# ग्राम पंचायत सदस्यांना डावलून मासिक सभा

## बारड ग्रामपंचायतचा तुघलकी कारभार

तभा वृतसेवा
मुदखेड, दि.२७ मे-

बारड ग्रामपंचायतच्या मासिक सभेसाठी विद्यमान सदस्यांना डावलले असल्याने ग्रामपंचायत द्वारे चालविल्या जाणाऱ्या तुघलकी कारभाराविरुद्ध उचित कारवाई करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे धाव घेऊ असे मत ग्रामपंचायत सदस्य तथा उबाठा शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख माणिक लोमटे यांनी व्यक्त केले आहे.

बारड ग्रामपंचायतच्या सातत्याने चालू असलेल्या तुघलकी कारभाराच्या विरोधात जिल्हा प्रशासनाने नुकतीच ग्रामसेवकाची 'उचलबांगडी' केली आहे. ग्रामसेवकाची 'उचलबांगडी' होऊनही गावातला अस्वच्छतेचा प्रश्न आजही जैसे थे आहे. आता ग्रामपंचायतच्या कारभाऱ्याकडून मासिक सभेत विद्यमान ग्रामपंचायत सदस्याला मासिक सभेचे निमंत्रणच पोहोचले नसल्याने तुगलकी कारभाराच्या विरोधात योग्य ती कारवाई करण्यासाठी जिल्हा मुख्यकार्यकारी अधिकाऱ्यांकडे ग्रामपंचायत सदस्य माणिकराव लोमटे दाद मागणार आहेत. बारड ता. (मुदखेड) येथील ग्रामपंचायतची मासिकसभा दि. २७ मे (मंगळवार) रोजी पार पडली. या मासिक




सभेसाठी माणिकराव लोमटे, राहुल आठवले, विलासराव देशमुख यांना बोलावले नसल्याने या तुघलकी कारभाराच्या विरोधात ग्रामपंचायत सदस्य एकवटले आहेत. गावात अनेक समस्या असुन अस्वच्छता विषयीचा प्रश्न गंभीर असताना पावसाळ्याच्या तोंडावर गाव अस्वच्छतेने गलितगात्र झाले आहे.

**हा राजकिय डाव :राहुल आठवले**

मासिक सभेच्या निमित्ताने संबंधित ग्रामसेवकांशी बोलणे झाले होते. आपणास कळवू असे ग्रामसेवकाने सांगितले होते. परंतु मासिक सभेच्या बैठकीचे निमंत्रण मिळाले नाही. कदाचित हा राजकीय डाव असून, संबंधितावर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य राहुल आठवले यांनी केली.

**यापुढे दक्षता घेतली जाईल: सतिष लाठकर**

संबंधित मासिक बैठकीचे नोटीस बुक कार्यालयीन कर्मचाऱ्यांकडून प्रत्येक ग्रामपंचायत सदस्याकडे जायला हवे होते. या संदर्भाने सर्व माहिती घेऊन यापुढे दक्षता घेतली जाईल असे आश्वासन ग्रामसेवक सतिष लाठकर यांनी दिले.

# पावसामुळे मशागतीची कामे झाली ठप्प

तभा वृतसेवा
नायगाव, दि.२७ मे-

नायगांवात मंगळवारी दुपार नंतर मान्सून अगोदर बेमौसमी पावसाची जोरदार हजेरी पडल्याने नायगांव शहरातील मुख्य रस्त्यावर घाण पाण्याचे साम्राज्य पसरले येथील सर्व शेतकरी बांधवांचे खरिप हंगामातील पीक लागवडी पूर्वी करावी लागणारी शेती तील मशागतीच्या कामे अर्धवट राहिल्याने परिसरातील शेतकरी वर्गात सध्या चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरवर्षा पेक्षा यंदाचे वर्ष हे शुभ कार्य व विवाह सोहळे साजरे करण्यासाठी भारतीयसंस्कृतीच्या परंपरेनुसार शुभघटीका असल्यामुळे राज्यातील शेतकरी राजा खरिप हंगामातील पीक लागवडी पूर्वीची शेतीतील मशागतीची कामेही मे महिन्यात करावी या उद्देशाने विवाह सोहळे या सारख्यी शुभ कार्य उरकून घेण्यात व्यस्त असलेला पहायला मिळाला. परंतू अचानक पणे मे महिन्याच्या सुरुवाती पासूनच वातावरणात खुप मोठ्या प्रमाणात बदल झाला.आणि यंदा मात्र मान्सून तब्बल अकरा वर्षापूर्वी असाच वेळे आधी केरळमध्ये दाखल होणार आशा बातम्या मागील अनेक दिवसांपासून प्रसार माध्यमांतून प्रसारीत होत असल्यामुळे नायगांव तालुक्यातील शेतकरी हा खरिप हंगामा तील लागवडीपूर्वी शेतीचे मशागतीचे कामे उरकून घेण्याच्या धावपळीत व्यस्त होता. परंतु दि.२७ रोज मंगळवारी सकाळी पासुनच आभाळात काळे दाटून आले. आणि अचानकपणे दूपार नंतर नायगांवात तब्बल एक तास जोरदार बेमौसमी अवकाळी पावसाची बॅटींग झाल्याने संपूर्ण नायगांव शहरातील तुंबलेल्या नाल्यांतील घाण पणी मुख्य रस्त्यावर आल्याने परिसरातील नागरिकांनी शहरात खरेदी विक्री करण्यासाठी आलेल्यांना त्या घाण पाण्यातून जावे लागले आहे. जोरदार पडलेल्या पावसामुळे नायगांव बाजार पेठ ही पुर्णतः जलमय झाली होती. तर हल्ली मुक्कामी नायगांव येथील शेत करी जोरदार पडलेल्या पावसामुळे शेतातील मशाग तीचे कामे अर्धवट सोडून घराकडे यावे लागले आहे. अशा ह्या बेमौसमी पडलेल्या पावसामुळे शेतातील चिपाड वेचणी ह्या सारखी उरलीसुरली कामे ही होतील का नाही? ह्या शंकेने नायगाव परिसरातील शेतकरी वर्गत सध्या अस्वस्थता पसरल्याचे चित्र दिसुन येत आहे.



लोहा- मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील नगर परिषद कार्यालयाच्या वतीने नाले सफाईला करण्यात येत आहे. यासाठी उल्हास राठोड, कृष्णा कठाळे, रावसाहेब नळगे,गजानन दांगटे,चांदू राजकोर, राजेंद्र सरोदे,धर्मानंद महाबळे,विष्णु भिसे कामाला लागले आहेत.

## माजी सैनिकांनी नोंदणी करण्याचे आवाहन

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२७ मे-

भारत सरकारच्या उपमहासंचालक, सिव्हिल डिफेन्स यांच्या नेत्वृत्वाखाली मॉक ड्रिल सराव आयोजित करण्याबाबत राष्ट्रीय स्तरावर नागरी संरक्षण स्वयंसेवक म्हणून सिव्हिल डिफेन्स रेग्युलेशन १९६८ नुसार ईएसएम माजी सैनिक यांची भरती करावयाची आहे. तरी नांदेड जिल्ह्यातील सर्व माजी सैनिकांनी नागरी संरक्षण स्वयंसेवक साठी आपले नाव तात्काळ जिल्हा सैनिक कार्यालयास नोंदणी करावे,

## संक्षिप्त वृत्त

### वैकुंठ स्मशानभूमीत श्रमदान, सोयीसुविधा केल्या उपलब्ध

**हिमायतनगर -** हिमायतनगर शहराती लकडोबा चौक येथील हिंदू वैकुंठ स्मशानभूमीच्या सदस्यांनी दर रविवारी दोन तास श्रमदान करून तेथील



परिसर स्वच्छ व सुंदर करून अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांसाठी सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. परमेश्वर देवस्थान ट्रस्ट कमिटी व माजी आ. माधवराव जवळगावकर यांच्या मदतीने सर्व भौतिक सुविधा उपलब्ध करून घेतल्या. पण आता नव्यानेच या स्मशानभूमीच्या गतवैभवात एक भर पडली आहे. २३ मे रोजी येथील स्मशानभूमीसाठी शेव सितपेटी किनवट येथील दानशूर व्यक्तीने दिली असुन तसेच दर रविवारी नागरिक दोन तास स्मशानभूमीत श्रमदान करून एक नवा आदर्श निर्माण केला. लकडोबा चौक वैकुंठ धाम स्मशानभूमी ही अनेक भौतिक सुविधांचा अभाव होता. या सर्व भौतिक सुविधा येथील सदस्यांच्या लक्षात आल्याने लोकवर्गणीतून, स्वखर्चाने व श्रमदानातून करण्याचा संकल्प उचलून सदस्यांनी सुविधा उपलब्ध केल्या आहेत. बाहेर गावावरून अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांना कुठलीही अडचण भासू नये त्यासाठी येथे पाणी, रस्ता, बेल, सह सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यातच आता अंत्यविधीसाठी कुणाला उशीर किंवा सर्व शवविच्छेदनासाठी कुणाला उशीर होत असल्यास त्या प्रेताची विटंबना होऊ नये, यासाठी शेवसितपेटी उपलब्ध झाली आहे.

### पत्रकार देविदास सूर्यवंशी यांच्या कवितेला छत्रपती संभाजीनगर मध्ये सन्मानचिन्ह

**नरसी -** छत्रपती संभाजीनगर येथे वारसा साहित्य मंचच्या वतीने दि.२५ मे रोजी रविवारी पार पडलेल्या कविसंमेलनात नायगाव तालुक्यातील



नरसी येथील पत्रकार तथा कवी देविदास सूर्यवंशी यांनी सादर केलेल्या 'झाडे लावा' या कवितेला सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आल्याने सर्वत्र अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

वारसा साहित्य मंचच्या वतीने अनेक लेखक व कवी यांनी आपल्या कसदार साहित्यकृतीतून 'वारसा' हे वाचनीय पुस्तक साकारले आहे. या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा छत्रपती संभाजीनगर येथे ज्येष्ठ साहित्यिक भारत सातपुते यांच्या हस्ते होऊन भव्य कविसंमेलन पार पडले. यामध्ये नरसी तालुका नायगाव येथील पत्रकार तथा कवी देविदास सूर्यवंशी यांनी रसिकांची भरभरून दाद मिळवली. वारसा साहित्य मंचतर्फे या कवितेसाठी देविदास सूर्यवंशी यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सम्मानित केल्याने त्यांचे जेष्ठ पत्रकार सुर्यकांत सोनखेडकर, भुषण पारळकर, गंगाधर गंगासागरे, पंडीत वाघमारे, गोविंद टोकलवाड सह पत्रकार व मित्र मंडळी यांनी अभिनंदन केले आहे.

### आ. ॲड. श्रीजयाताई चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त छत्र्यांचे वाटप

**मुदखेड -**भोकर विधानसभा मतदारसंघाच्या युवा नेत्या लाडक्या आमदार ॲड. श्रीजयाताई चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय



जनता पार्टी युवा मोर्चाचे माजीजिल्हा उपाध्यक्ष कुणाल चौधरी यांच्या वतीने मुदखेड तालुक्यातील शेतकऱ्यांना ईजळी पाटीवर शेतकऱ्यांना छत्र्यांचे वाटप करण्यात आले. भोकर विधानसभा मतदारसंघाच्या आ. श्रीजयाताई चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त दि.२६ मे रोजी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष युवा नेते कुणाल चौधरी यांनी एक अभिनव आणि लोकाभिमुख उपक्रम राबवला असुन पावसाळ्याच्या दिवसांच्या पार्श्वभूमीवर त्यांनी तालुक्यातील इजळी येथील शेतकऱ्यांना आवश्यक सामग्रीचे वितरण केले, ज्यामुळे त्यांच्या शेतजमिनीवरील कामे सुरळीतपणे पार पडू शकतील असा उपक्रम राबविण्यात आला. कुणाल चौधरी हे भाजप युवा मोर्चाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष असून, राज्याचे माजी मुख्यमंत्रीखा. अशोकराव चव्हाण यांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या उपक्रमामुळे त्यांच्या सामाजिक जाणिवेचे आणि कार्यकर्त्यांच्या नात्याचे दर्शन घडते. त्यांनी कोणतीही मोठी घोषणा न करता, प्रत्यक्ष कृतीतून समाजसेवेचा आदर्श ठेवला आहे. या उपक्रमामुळे पंचक्रोशीतून कुणाल चौधरी यांच्या कार्याची प्रशंसा होत आहे. त्यांच्या या कार्यामुळे भाजपच्या युवा मोर्चा सामाजिक बांधिलकीचा प्रत्यय येतो आणि स्थानिक जनतेत सकारात्मक वातावरण निर्माण होते. यावेळी अंबादास पाटील मुगल, रावसाहेब पाटील मुंगल, भगवान मुंगल, अशोक मुंगल, किशनराव पाटील मुंगल, गुलाबराव पाटील, गोवर्धन मुंगल, अप्पाराव मुंगल, नारायण मुंगल, चेअरमन दिंगाबर पाटील, जळबाजी हाटकर, लाला पानेवार, कृष्णा मुंगल, गोपीराज मुंगल, कामाजी मुंगल, गिरीश मुंगल, देविदास पाटील, प्रभु पाटील य यासह आदींची उपस्थिती होती.

### आदमपूर परिसरात पावसाची संततधार

**आदमपूर -**आदमपूर:बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर परिसरात दोन दिवस उघाड देत पुन्हा अवकाळी पावसाची संततधार मंगळवार दि.२७ रोजी दुपारी तीन वाजेपासून सुरू होती. रानाशिवारात शेतकरीवर्गांस पूर्व माशागत करण्यासाठी आतुरता लागून राहिली.शेती कामांचा बेमोसमी पावसामुळे चहुकडे खोळंबा झाल्याचे चित्र चिंतेत लोटणारे आहे.सुरू असल्याने भर दिवसा किंवा रात्री उकाड्याने नागरिक त्रस्त आहेत.

# एचएसआरपी नंबर प्लेट वेळेत बसवा आणि दंड टाळा

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२७ मे-

ज्या वाहनांची ०१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेली आहे. त्या वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट नाही. अशा वाहनधारकांनी अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने शुल्क भरुन ३० जून २०२५ पूर्वी एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्यावी, असे आवाहन सहाय्यक प्रादेशिक परिवहन अधिकारी समीर याकुब शेख यांनी केले आहे.

केंद्रीय मोटार वाहन नियम,१९८९ च्या नियम ५० नुसार वाहनांस एचएसआरपी नंबर प्लेट बसविण्याची तरतूद आहे. तसेच रस्ते व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या G.S.R. ११६२ (ए) ०४ डिसेंबर २०१८ व ड.ज. ६०५२(ए) दि.०६.१२.२०१८ नुसार ०१ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्याची तरतूद करण्यात आली आहे. एचएसआरपी नंबर प्लेट विहित वेळेत न बसविल्यास मोटार वाहन कायद्यानुसार परिवहन विभागातर्फे दंड आकारणी करण्यात येणार आहे. वाहनधारकांनी दंड टाळण्यासाठी ३० जून २०२५ पूर्वी एचएसआरपी नंबर प्लेट बसवून घ्यावी.

वाहनांच्या नंबर प्लेटमध्ये छेडछाड व बनावटगिरी करुन होणारे गुन्हे कमी करणे, रस्त्यावर धावणाऱ्या वाहनांची ओळख पटविणे व तसेच राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व वाहनांना सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. वाहनधाकारंनी वाहनांना हाय सिक्युरीटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसविण्यासाठी ऑनलाईन अपॉईंटमेंटसाठी https://mhhsrp.com या संकेतस्थळावर भेट द्यावी.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हरिहरराव भोसीकर यांचे निधन ; आज पानभोसी येथे अत्यसंस्कार

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२७ मे-

नांदेड जिल्हयाच्या राजकारणात साडे तीन-चार दशके सक्रीय असलेले राज्य गृह व वित महामंडळाचे माजी अध्यक्ष व संचालक जिल्हा बँकेचे विद्यमान उपाध्यक्ष, जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष, या व अशा विविध पदावर राहिलेले प्रचंड लोकसंग्रह असलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष हरिहरराव विश्वनाथअप्पा भोसीकर यांची दीर्घ आजाराने वयाच्या ७० व्या वर्षी आज दि २७ रोज मंगळवारी निधन झाले. पानभोसी ता कंधार येथे दि. २८ रोज बुधवार सकाळी ११ वाजता त्यांच्यावर अत्यसंस्कार करण्यात येणार आहेत,

नव्वदीच्या काळात जिल्ह्याच्या राजकारणात कुंटुरकर गोरठेकर भोसीकर चिखलीकर यांचा जिल्हा परिषदेच्या राजकारण व प्रशासनात दबदबा होता. हरिहरराव भोसीकर यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात १९८० मध्ये कंधार तालुका खरेदी-विक्री संघाच्या संचालक पदापासून झाली हरिहरराव भोसीकर यांनी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष, कृषी व पशुसंवर्धन सभापती, तसेच राज्याच्या गृह व वित महामंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्य केले. त्यांनी तीन वेळा जिल्हा मध्यवर्ती सहकारी उपाध्यक्ष पद भूषविले. १९८२ मध्ये जिल्हा युवक काँग्रेसचे सरचिटणीस- पं. स. कंधार सदस्य ,१९९२ ९५ या काळात कंधार तालुका काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष .कलंबर सर्कल ९२ ते ९७ जि.प. सदस्य, १९९५-२००२- कुरुळा सर्कल जिल्हा परिषद सदस्य - २००३ ते २००८- बहादरपुरा जि प सदस्य १९९७-२००० - जिल्हा बँकेचे पहिल्यांदा उपाध्यक्ष, १९९७ जि.प.उपाध्यक्ष ऑगस्ट २००० - राज्याच्या गृह व वित् महामंडळाचे अध्यक्ष जानेवारी २००० मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश २००४ मध्ये कंधार विधानसभा निवडणूक अपक्ष म्हणून लढविली.. राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष, राज्य प्रदेश उपाध्यक्ष प्रदेश सरचिटणीस म्हणून काम केले



संपूर्ण जिल्हयात त्यांच्या कार्याची ओळख होती. देशाचे माजी गृहमंत्री डॉक्टर शंकरराव चव्हाण,याच्या सोबत त्यांनी सुरुवातीला काम केले राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक खा. शरद पवार, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विश्वासू म्हणून ते परिचित होते. प्रतापराव - हरिहरराव ही जोडगोळी नव्वदच्या दशकात जि.प. मध्ये प्रसिद्ध होती.कुंटुरकर गोरठेकर - टाकळीकर - यांच्या भोसीकर होते मित्रभाषी व मोठा लोकसंग्रह आणि कामाचा प्रचंड उरक असलेले हरिहरराव भोसीकर याचे राजकीय कारकीर्द मध्ये चढ उतार आके शेवटच्या टप्प्यात आजारामुळे त्याचा संपर्क कमी झाला पण पक्ष कार्य सुरूच होते.मंगळवार २७ मे रोजी सकाळी त्यांनी जगाचा निरोप घेतला.. त्यांच्या पश्चात पत्नी मुलगा शिवकुमार , बाळासाहे व नितीन हे तीन मुले स्नूषा, नानु भाऊ, पुतणे, भावत्री असा परिवार आहे त्यांच्या निधनामुळे लोहा- केधार तालुक्याची मोठी राजकीय हानी झाली..

(छाया: सिध्दीविनायक, किनवट)



किनवट- केंद्रीय गृह व सहकार मंत्री अमित शाह यांचे नांदेड विमानतळावर स्वगत करताना किनवट-माहुर मतदारसंघाचे आमदार भिमराव केराम

# प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या उपस्थितीत आज काँग्रेसची जय जवान जय किसान तिरंगा महारॅली

तभा वृतसेवा
नांदेड, दि.२७ मे-

भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूरच्या रुपाने मिळविलेल्या ऐतिहासिक विजयाबदल कृतज्ञता व शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी नांदेड शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतिने आज बुधवार रोजी जय जवान जय किसान तिरंगा महारॅली आयोजित करण्यात आली आहे. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह इतर मान्यवर रॅलीत सहभागी होणार आहेत. सकाळी दहा वाजता पक्ष कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय दरम्यान ही रॅली असणार आहे, अशी माहिती खा. रविंद्र चव्हाण यांच्यासह, जिल्हाध्यक्ष तथा माजी आ. हणमंतराव पाटील बेटमोगरेकर, महानगराध्यक्ष अब्दुल सत्तार यांनी दिली आहे. पहलगाम घटनेला प्रतिउत्तर देते भारतीय सैनिकांनी केलेल्या ऑपरेशन सिंदूरच्या सन्मानार्थ आणि शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी किसान सन्मानाची जोड देत नांदेड काँग्रेसच्या वतीने आज बुधवार, रोजी जय जवान जय किसान रॅली आयोजित करण्यात आली आहे. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, प्रदेश सहप्रभारी कुणाल चौधरी, माजी मंत्री अमित देशमुख, खा. डॉ. शिवाजी काळगे, प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, नांदेड जिल्हा काँग्रेस निरिक्षक तुकाराम रेंगे पाटील आदी मान्यवर मंडळी या रॅलीत सहभागी होणार आहेत. सकाळी दहा वाजता, नवा मोंढा काँग्रेस पक्ष कार्यालय येथील रॅलीला सुरुवात होईल. आयटीआय, शिवाजीनगर, एसपी कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्ग महात्मा गांधी पुतळा येथे समारोप होईल.

# जनतेचा मी लोकसेवक; शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध : नगरध्यक्ष दोसानी

तभा वृतसेवा
माहुर, दि.२७ मे-

माहूर शहरातील जनतेचा मी लोकसेवक असून, शहरातील नागरिकांच्या समस्यांचे निवारण करणे, शासकीय योजनांची अंमलबजावणी करणे,शहरात शांतता व सुव्यवस्था राखणे ही कर्तव्ये पार पाडताणा शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे! असे प्रतिपादन नगराध्यक्ष फिरोज दोसानी यांनी तरुण भारत शी संवाद साधताना केले.

नागरिकांच्या दृष्टीने नगराध्यक्षाची कर्तव्ये पार पाडण्याच्या कसोटीवर माहूरचे विद्यमान नगराध्यक्ष फिरोज दोसानी हे खरे उतरले असून, त्यांनी आपल्या विकासात्मक दृष्टीकोनातून एकेकाळी माहूरकरांच्या 'उशाला पैनगंगा अन् घशाला कोरड' अशा बिकट व उपहासात्मक परिस्थितीतून शासनाच्या मंजुरी अधीन असलेल्या नवीन पाणीपुरवठा नळ योजनेसाठी सातत्याने पाठपुरावा करून मंजूर नळयोजनेद्वारे सध्या दोन ते तीन दिवसांआड घरोघरी पाणीपुरवठा करुन माहूरकरांना दैनंदिन सह भर उन्हाळाभर मुबलक पाण्याची



सोय उपलब्ध करून दिल्याबद्दल भाविकांसह, नागरिकांमधून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

नगराध्यक्ष म्हणून त्यांनी माहूर शहरातील विकास योजनांसाठी अनेक महत्त्वाची विकासकामें केलेली आहेत. त्यात पैनगंगा नदीवरील नगरपंचायतची नळयोजना वाढत्या लोकसंख्येच्या मागणीपुढे अपुरी पडल्यामुळे साधारणपणे १० वर्षांपूर्वी नागरिकांना खाजगी टँकर व टाकीद्वारे विकतचे महागडे पाणी महत्प्रयासाने मिळत असे,ते सुद्धा दोन दोन किलोमीटर लांब रांगेमध्ये उभे राहून.

नगराध्यक्षपदी विराजमान होताच त्यांनी मागील काळात नवीन नळ योजनेसाठी शासनाधीन असलेल्या सदरील मागणी प्रस्तावाचा सातत्याने पाठपुरावा करून मंजूर झालेल्या नवीन नळ योजनेचे शहरात पाईपलाईनचे विस्तारीकरण करत योग्यप्रकारे नियोजन केल्याने आता नागरिकांना भर कडक उन्हाळ्यातही दोन ते तीन दिवसाआड मुबलक पाणी मिळत असल्याने शहरासह गडावरील पाणीटंचाईची समस्या दूर झाली आहे.

सध्या धनोडा येथील पैनगंगा नदीवर सुरू असलेल्या उच्च पातळी बंधाऱ्याचे काम प्रगतीपथावर असून, हे काम पूर्ण झाल्यानंतर माहूरकरांची भविष्यातील कायमस्वरूपी पाणीटंचाईची समस्या दूर होईल असे दुरदृष्टीपूर्ण योग्य नियोजन केल्याने नगराध्यक्ष फिरोज दोसानी, मुख्याधिकारी विवेक कांदे, कार्यालयीन अधीक्षक वैजनाथ स्वामी यांचेसह सर्व पदाधिकारी,इतर अधिकारी व कर्मचाऱ्यांचेसुद्धा महत्वाचे भरीव योगदान असल्याने ह्या सर्वांचा नागरी सत्कार होणे अपेक्षित आहे. ग्रामीण रुग्णालय माहूर येथे पाणीपुरवठा करणारी खंडाखोरी तलाव येथील जुनी नळ योजना कुचकामी ठरुन बंद पडल्यामुळे नगराध्यक्ष फिरोज दोसानी हे स्वयं खर्चातून टँकरद्वारे दौरा पाणी पुरवठा करणारे बहुधा पहिलेच नगराध्यक्ष असावेत.शहरांत विविध ठिकाणी माजी आमदार स्व.प्रदीप नाईक स्मृतीप्रीत्यर्थ पान पोईची व्यवस्था त्यांनी केली आहे. नवरात्र काळात मातेच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखों भाविकांना टँकरद्वारे व पायऱ्यांवर दर्शनरांगेत उभे असताना शुद्ध पेयजल व्यवस्था म्हणून पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या वाटण्याचे अनोखे पुण्याचे काम ते करतात, हे ही नसे थोडके.गोर गरीबांना लग्न व इतर कार्यक्रमात मोफत टँकरद्वारे पाणी पुरवठा, तसेच मागील काळात दत्त जयंती यात्रेच्या वेळी तत्कालीन मुख्याधिकारी डोईफडे तथा कार्यालयीन अधीक्षक वैजनाथ स्वामी, तत्कालीन नगरसेवक इलियास बावाणी, लघु पाटबंधारे विभागाचे सुर्वे, गावंडे यांचेसोबत संपूर्ण रात्रभर नदी पात्रात राहून माहूरचा पाणीपुरवठा सुरळीत व नियमित व्हावा यासाठी सामुहिक प्रयत्न केले.

शहरात सिमेंट कॉंक्रीटचे गुळगुळीत रस्ते, सांडपाणी नाल्या,विजेची व्यवस्था, अग्निशमन, आपात्कालीन पथक, यात्रानियोजन , यात्राकाळात वाहनतळ, साफसफाई,स्वच्छता आदींसह शासनाच्या विविध योजनां शहरामध्ये राबवत केलेल्या विकासकामांमुळे माहूर नगरपंचायत ही जिल्ह्यात अग्रेसर असून,राज्यात स्वच्छता अभियानात अग्रक्रम मिळवलेली माहूर नगरपंचायत अर्थातच नगराध्यक्ष दोसानी व सर्व पदाधिकारी तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी खरोखरच अभिनंदनास पात्र असल्याच्या कौतुकास्पद प्रतिक्रिया शहरातील विकासप्रिय नागरिकांमधून ऐकावयास मिळत आहेत.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# आडत व्यापाऱ्यांना गंडवीणारा महाठक बालाजी कोयले माजलगाव पोलिसाच्या जाळ्यात

**पाच दिवसाची पोलीस कोठडी; योगेश हांडे फरार**

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२७ मे**

माजलगावसह नागपूर, बिलोली, धाराशिव, लातूर, कर्नाटक येथील यादगीर व महाराष्ट्र राज्यातील अनेक आडत व्यापारी यांना बनावट व्यापारी – ब्रोकर्स बनून करोडो रुपयांना चुना लावलेला महाठक बालाजी कोयले अथक प्रयत्ननंतर माजलगाव पोलिसाच्या जाळ्यात अडकला आहे. त्याला माजलगाव न्यायालया ने पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे.त्याचा सहकारी योगेश हांडे आजही फरार आहे.

माजलगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा रजि. नं.७६/२०२४ या गुन्हयामध्ये आरोपी नामे बालाजी एकनाथ कोयले व योगेश लालासाहेब हांडे यां दोघांनी फिर्यादी विष्णुदास भिकुलाल भुतडा, वयः४० माजलगाव यांना ३२ लाख रु ला गण्डवले होते.भूतडा यांच्या माजलगाव येथील शिवम ट्रेडींग कंपनी या आडत दुकानमध्ये दिनांक २७/०२/२०२४ रोजी तुर चना विक्रीसाठी आहे का असे म्हणून लातुर येथील गोपाल कॅन्ड्रॉसिंग च्या बनवट नावाखाली बालाजी एकनाथ कोयले व योगेश लालासाहेब हांडे त्यांनी चना माल एकूण १२१ क्वींटल ५० किलो त्याची एकूण किंमत ७,४२,०००/– व तुर माल २५ टन ज्याची किंमत २५,३७,५६५/– असे घेवून सदर माल हा माहेश्वरी पल्सेस दाल मिल लातुर या ठिकाणी दयावयाचा असल्याचे सांगून त्या नावाने सदरील दोन्ही मिळुन बिलाची एकूण रक्कम रु.३२,७९,७६५/– रुपये या नावाने बिल करून सदर बिलाची रक्कम आर.टी.जी.एस. व्दारे देतो असे म्हणुन सदरील माल ट्रक क्रमांक एम एच ४० सी.एम.४५९० या ट्रकने नेवून त्यांनी परस्पर विक्री करून फसवणुक केली होती. फिर्यादीनुसार बालाजी एकनाथ कोयले व योगेश लालासाहेब हांडे यांच्या विरुध्द कलम ४२०,४०६ व ३४ नुसार गुन्हा रं.नं.७६/२०२४ हा दाखल झालेला होता. या गुन्ह्यात तबल सव्वा वर्षानंतर यश आले असून यातील मुख्य आरोपी बालाजी कोयले पोलिसाच्या ताब्यात आहे. त्याने यादगीर कर्नाटक येथील व्यापाऱ्यास दोन कोटींचा, बिलोली येथील व्यापाऱ्यास १८ लाखास, माजलगाव येथील कोल्हे या व्यपाऱ्यास १२ लाख तर लातूरला एम आय डी सी पोलीस ठाण्यात दरोडा व फसवूक या गुन्ह्यात हा आरोपी आहे.माजलगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राहुल सूर्यतळ, उपनिरीक्षक सतीश दिंडे यांनी यास अटक केली असून पाच दिवसाची पोलीस कोठडी मिळाली आहे.

## ‘माय छोटा स्कूल’ म्हणजे जगाच्या स्पर्धेत मुलांना यशस्वी होण्याचं बाळकडू देणारी शाळा–ना.संजय शिरसाट

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ मे**

आज जागतिक पातळीवर मोठ्या प्रमाणात स्पर्धा सुरू आहे. प्रत्येक क्षेत्रात रोज नवनवी क्रांती होत आहे. त्याच धर्तीवर शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल घडत आहेत. आपली मुलं जागतिक स्पर्धेत टिकवून रहावीत असे वाटत असेल तर त्या दृष्टीने पालकांना तयारी करावी लागते. पिंगळे सरांच्या संकल्पनेतून साकारलेली माय छोटा स्कूल ही शाळा नव्या पिढीला दिशा देणारी आहे. कारण मुलांच्या बौद्धिक विकासासाठी २ ते १० वर्ष हे वय चांगले मानले जाते. अगदी त्याच वयात मुलांवर योग्य संस्कार करून त्यांना आनंदी वातावरणात शिक्षणाची गोडी लावणारी ही शाळा म्हणजे जागतिक स्पर्धेत टिकवून ठेवणारे बाळकडू म्हटले तर वावगे ठरणार नाही असे प्रतिपादन राज्याचे सामाजिक न्याय मंत्री ना. संजयजी शिरसाठ यांनी केले.

शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख बाळासाहेब पिंगळे यांनी बीड शहरात नव्याने सुरू केलेल्या माय छोटा स्कूल या शाळेला ना. शिरसाठ यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी शाळेचे कौतुक करताना बोलत होते. यावेळी पटवर्धन साहेब जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळुक, स्वप्निल गलधर, बाजीराव चव्हाण, विपुल पिंगळे, सागर बहीर, चंद्रकांत नवले स्कूलचा प्राचार्या पुजा, मोनिका यांची उपस्थिती होती.

# बीडच्या विद्यार्थ्यांनी मारली बाजी!

## ऑलिंपियाड परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ मे**

जगातील सर्वात मोठे ऑलिंपियाड असलेल्या सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनने घेतलेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाड परीक्षेत बीडच्या तीन विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय क्रमांक मिळवला. प्रमोद जी. महाजन न्यू इंग्लिश स्कूलच्या होलाम्बे अद्वैत सूरजने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आणि आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक आणि प्रमाणपत्र जिंकले. प्रमोद जी महाजन न्यू इंग्लिश स्कूलच्या गुजर अवधूत लिंब्रतनेही आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये दुसरा क्रमांक मिळवला आणि आंतरराष्ट्रीय रौप्य पदक आणि प्रमाणपत्र मिळवले. परळी येथील माध्यमिक विद्यालयाच्या भेल आरुष चंद्रकांत कोहलीनेही आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिंपियाडमध्ये तिसरा क्रमांक मिळवला आणि प्रमाणपत्रासह आंतरराष्ट्रीय कांस्य पदक मिळवले.

या वर्षीच्या एसओएफ ऑलिंपियाडमध्ये ७२ देशांतील सुमारे लाखो विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता ज्यात बीडमधील २५३०० हून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश होता. सहभागींमध्ये बीडमधील प्रमोद जी महाजन न्यू इंग्लिश स्कूल, इंडो ब्रिटिश ग्लोबल स्कूल यासारख्या उल्लेखनीय शाळांचा समावेश होता.

सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशन (एसओएफ) ने दिल्लीतील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर येथे २०२४–२५ च्या ऑलिंपियाड परीक्षेतील टॉपर विद्यार्थ्यांचा सत्कार केला. या प्रसंगी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमात संबोधित करताना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश जे.के. माहेश्वरी म्हणाल्या की, आजच्या पिढीला ज्ञानाबरोबरच मूल्यांनी सक्षम करणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे.सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनचे संस्थापक संचालक महाबीर सिंग म्हणाले की, २०२४–२५ च्या ऑलिंपियाड परीक्षेत ७२ देशांमधील ४००० शहरांमधील ९६,४९९ हून अधिक शाळांमधील लाखो विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विजय कुमार शुक्ला आणि भिवानी हरियाणा येथील सीबीएलयूचे डीन डॉ.सतीश आर्य हे देखील कार्यक्रमाला विशेष पाहुणे म्हणून उपस्थित होते.

# शेतकरी बांधवांच्या अडचणींबाबत उपाययोजना करा

## आ.संदीप क्षीरसागरांची शासन, प्रशासनाकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ मे**



बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रातील बीड व शिरूर कासार तालुक्यातील शेतकर्यांच्या विविध अडचणी आणि मागण्यांच्या संदर्भात शासन आणि प्रशासनाकडून तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी शासन अणि प्रशासनाकडे केली आहे.

या आहेत मागण्या

–अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेती पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून सरसकट नुकसान भरपाई द्यावी.

– सन २०२० व २०२३–२४ चा रखडलेला संपूर्ण पिक विमा सरसकट देण्यात यावा. तसेच जे शेतकरी विम्यापासून वंचित राहीले आहेत त्यांना १०० टक्के विमा देण्यात यावा.

– सन २०२३–२४ मधील अतिवृष्टी अनुदानाची रक्कम तात्काळ शेतकर्यांना वितरीत करावी.

– शेतीचे जंगली जनावरांपासून संरक्षण करण्यासाठी मदत मिळावी.

– खरीप हंगामासाठी लागणारे बी–बियाणे योग्य दरात मिळावेत. तसेच पारदर्शक आणि योग्य पद्धतीने शेतकर्यांपर्यंत पोहोचावेत.

– बीजोत्पादक व शेडनेट धारक शेतकर्यांचा पीक विमा योजनेत सामावेश करावा. तसेच त्यांना इतर सामान्य शेतकऱ्यांप्रमाणेच शासकीय नुकसान भरपाई मिळावी.

– बीज उत्पादक कंपन्यांना शेडनेट धारक शेतकऱ्यांच्या बाबत हिताचे निर्णय घेणे बंधनकारक करावे.

– शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित योग्य जास्त भाव देण्यात यावा.– शेतकरी बांधवांना सोलार पंप उपलब्धतेसाठी सुनियोजन व्हावे. – कपाशी पिकाला किमान १२ ते १४ हजार रुपये प्रति क्विंटल तर सोयाबीन पिकाला ८ ते १० हजार रुपये प्रति क्विंटल भाव देऊन आर्थिक सहकार्य करावे.– शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी देऊन आर्थिक बळकटी द्यावी. तसेच नवीन पीक कर्ज देण्यासाठी बँकाना तातडीने सुधारीत आदेश द्यावेत.

## पात्र शेतकऱ्यांना शंभर टक्के पीक कर्ज वाटप करा; बियाणांचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा

### शेतकऱ्यांच्या प्रश्नावर डॉ.ज्योतीताई जिल्हाधिकाऱ्यांना भेटल्या

### डॉ. ज्योती मेटे यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ मे**

हवामान खात्याच्या अंदाजानुसार मान्सून महाराष्ट्रामध्ये दाखल झाला असून यावर्षी पर्जन्यमान सरासरी पेक्षा जास्त आहे ही बाब अतिशय समाधानकारक आहे. पात्र शेतकऱ्यांना खरीप हंगाम २०२५ मध्ये शंभर टक्के पीक कर्ज वाटप होणे आवश्यक आहे. जानेवारी ते एप्रिल २०२५ अखेर महाराष्ट्रात झालेल्या शेतकरी आत्महत्येचा विचार करता महाराष्ट्रात सर्वाधिक शेतकरी आत्महत्या बीड जिल्ह्यात झालेल्या आहेत ही बाब क्लेशकारक आहे. कर्जबाजारीपणा, शेतमालाला हमीभाव नसणे, हवामानाचा फटका या बाबी शेतकरी आत्महत्यास कारणीभूत ठरतात हे विचारात घेता जिल्ह्यातील पतआराखड्यानुसार खरीप हंगाम २०२५ करिता रुपये १५६६ कोटी इष्टांक पूर्तते करिता डी.एल.सी.सी मध्ये नियमित आढावा घेऊन इष्टांक पूर्तेते बाबत जिल्हा अग्रणी बँकेस सूचित करण्यात यावे आणि पत्र शेतकऱ्यांना शंभर टक्के पीक कर्ज वाटप करून बियाणांचा काळाबाजार आणि बोगसगिरी रोखा या संदर्भात शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी आज जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची भेट घेतली.

बीड जिल्ह्यामध्ये खरीप हंगाम २०२४ चे इष्टांक रु १७०७ कोटी पैकी ११७३ कोटी पूर्तता ६९% आहे. पैकी बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची पूर्तता ६१% आहे. या बँकेची आर्थिक स्थिती विचारात घेता राष्ट्रीयकृत बँकेकडून अपेक्षित पूर्तता झालेली नाही, ही बाब विचारात घेता चालू खरीप हंगामामध्ये एकूण इष्टांक रुपये १५६६ कोटी पैकी राष्ट्रीयकृत व इतर बँकांकडून इष्टांक पूर्तता अनिवार्य करण्यात यावी. कृषी, महसूल व सहकार विभागाचे समन्वयातून पात्र खातेधारकांना १०९% सभासद करून घेणे व नवीन सभासदांना कर्ज वाटप करण्याची विशेष मोहीम हाती घेणे आवश्यक आहे.

चालू हंगामात शेतकऱ्यांना खते बी बियाणे यांचा मुबलक पुरवठा वेळेत होईल तसेच त्यांचे लिंकिंग होणार नाही याकरिता यंत्रणेने दक्ष राहणे तसेच बोगस बियाणे व चढ्या दराने विक्रीस प्रतिबंध करण्यात यावा व त्याविरुद्ध दाद मागण्याची यंत्रणा शेतकऱ्यांकरिता प्रसिद्ध करण्यात यावी. असे दिलेल्या निवेदन

डॉ. ज्योती मेटे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना विनंती केली जेणेकरून शेतकऱ्यांची खरीप हंगाम २०२५ मध्ये फसवणूक होणार नाही. या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, जिल्हाध्यक्ष प्रा. सुभाष जाधव, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे पाटील, शहराध्यक्ष सुहास पाटील, तालुकाध्यक्ष पंडित माने, मनोज जाधव, जितांजली डोरले,संगीता ठोसर, हरिश्चंद्र ठोसर, प्रशांत डोरले आदी उपस्थित होते.

सर्व कृषी सेवा केंद्र बाहेर शेतकऱ्यांसाठी हेल्पलाइन नंबर लावणारा – विवेक जॉन्सन

या मागण्यांना मा.जिल्हाधिकारी महोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत उपरोक्त विषयांवर जिल्हा प्रशासन तत्परपणे काम करेल असे आश्वासन दिले. त्याचबरोबर बोगस बियाणे आणि बियाणे खरेदी करताना शेतकऱ्यांना समस्या निर्माण होऊ नये याकरिता प्रशासनाच्या वतीने टोल फ्री क्रमांक आणि थेट जिल्हाधिकाऱ्यांना समस्या पोहोचतील याकरिता एक मोबाईल नंबर सर्व कृषी सेवा केंद्रांच्या बाहेर जाहीर रित्या लावण्यात येईल,डी.एल.सी.सी सभेमध्ये कर्ज वाटपाचा नियमित घेण्यात येईल असे त्यांनी यावेळी नमूद केले.

# श्री क्षेत्र चाकरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह

## प्रदीप मिश्राजी यांची शिवमहापुराण कथा

### माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास उपस्थित रहावे – महादेव महाराज

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२७ मे**



विसाव्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली दादा महाराज श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या पंचविसाव्या पुण्यस्मरणार्थ रौप्यमहोत्सवी सोहळ्याचे भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन व प. पू. श्री प्रदीप मिश्राजी यांची शिवमहापुराण कथा होणार आहे. माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास भाविक भक्तांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन तपोनिधी, शांतीब्रह, गुरुवर्य महादेव महाराज (तात्या) श्री क्षेत्र चाकरवाडी यांच्या वतीने करण्यात येत आहे.

भव्य अखंड हरिनाम सप्ताह मध्ये आंतरराष्ट्रीय शिवकथाकार प. पू. प्रदीप मिश्राजी सिहोर वाले यांची शिवमहापुराण कथा दुपारी १ ते ४ वाजेपर्यंत दि. ०८ जून ते १४ जून दरम्यान होईल, सायंकाळी अभंगवाणी (संगीत भजन) महाराष्ट्रातील ख्यातनाम गायक मंडळी सादरीकरण करणार आहे. रात्री अभंग संकीर्तन सेवा दि. ०७ जून शनिवार लक्ष्मण महाराज मेंगडे, (श्री क्षेत्र बंकटस्वामी महाराज मठ संस्थान श्री क्षेत्र नेकनुर), दि. ०८ जून रविवार प्रकाश महाराज बोधले, (संतपिठ श्री क्षेत्र पैठण तथा राष्ट्रीय अध्यक्ष अ. भा. वा. मंडळ), दि. ०९ जून सोमवार अमृताश्रम स्वामी महाराज (मंगलमूर्ती देवस्थान, राजुरी नवगण), दि. १० जून रोजी मंगळवार भागवताचार्य मुकुंद काका जाटदेवळेकर, दि. ११ जून बुधवार रोजी माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी पुण्यस्मरणार्थ गुलालाचे कीर्तन वारकरी संप्रदायभूषण रामायणाचार्य रामरावजी महाराज ढोक, नागापूरकर यांचे सकाळी १० ते १२ होणार आहे. रात्री रामायणाचार्य समाधानजी महाराज शर्मा यांचे रात्री ८ ते १० वेळेत होणार आहे. दि १२ जून गुरुवार रोजी व्याकरणाचार्य अर्जुन महाराज लाड गुरुजी, श्री क्षेत्र होळ, दि.१३ जून शुक्रवार रोजी महादेव महाराज राऊत, बीड, यांची कीर्तन सेवा होईल. दि. १४ जून शनिवार रोजी काल्याचे कीर्तन संदीपान महाराज हासेगावकर यांचे होणार आहे.

कीर्तन सेवा झाल्यानंतर हरिजागर,भारुड, हरिपाठ, काकडा भजन, असे भव्य दिव्य कार्यक्रमांचे आयोजन श्री क्षेत्र चाकरवाडी येथे माऊली दादाच्या रौप्यमहोत्सवी सोहळ्यास करण्यात आले आहे. जास्तीत जास्त भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन तपोनिधी शांतीब्रह गुरुवर्य श्री ह. भ. प. महादेव महाराज ( तात्या) चाकरवाडीकर यांनी केले आहे.

# उज्ज्ञोत प्रिमियर लीग–२०२५ चे अंबाजोगाईत आयोजन

## नवकेशर सुपर किंगची विजयी सलामी ; सचिन उपाडे ठरले ’मॅन ऑफ द मॅच’

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ मे**

येथील उज्ज्ञोत फाऊंडेशन आणि योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ’उज्ज्ञोत प्रिमियर लीग – २०२५’ चे अंबाजोगाईत आयोजन करण्यात आले आहे. सुरूवातीच्या सामन्यात नवकेशर सुपर किंगने विजयी सलामी देत २ षटके राखून १३ षटकांत (ओव्हर) मध्ये ८७ धावा काढून सामना जिंकला. तर आर.आर.पॉलिटेक्निक संघाने ८३ धावा काढल्या. या सामन्यात नवकेशर सुपर किंगचे गोलंदाज सचिन उपाडे हे ३ षटकांत (ओव्हर) मध्ये ११ धावा देत आणि २ विकेट घेत ’मॅन ऑफ द मॅच’ ठरले. उज्ज्ञोत प्रिमियर लीगला क्रिकेट प्रेमींचा भरभरून प्रतिसाद लाभत आहे.




अंबाजोगाई शहरातील श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या भव्य राजमाता जिजाऊ मैदानावर उज्ज्ञोत फाऊंडेशन आणि योगेश्वरी क्रीडा प्रबोधिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ’उज्ज्ञोत प्रिमियर लीग – २०२५’ चे अंबाजोगाईत आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धा रविवार, दिनांक २५ मे २०२५ पासून सुरू झाल्या आहेत. ’उज्ज्ञोत प्रिमियर लीग – २०२५’ मध्ये नवकेशर सुपर किंग, अजिंक्य सिसी, आर.आर.पॉलिटेक्निक, द लिगल ईगल, आयडियल क्रिकेट क्लब आणि विराट वायपर्स या सहा संघांनी सहभाग घेतला आहे. हे सामने सकाळी ७ ते दुपारी ४ वाजेपर्यंत या वेळेत लेदर बॉलवर खेळवले जात आहेत. या सामन्यांचे पंच (अंपायर) म्हणून संघर्ष इंगळे आणि अशोक खाडे यांनी काम पाहिले. तर सामन्याचे बहारदार समालोचन (कॉमेंट्री) ज्योतिराम परळकर यांनी केले. नवकेशर सुपर किंग आणि आर.आर.पॉलिटेक्निक या दोन्ही तुल्यबळ संघात झालेल्या सुरूवातीच्या सामन्यात आर.आर.पॉलिटेक्निक संघाने ८३ धावांचे लक्ष नवकेशर समोर ठेवले होते. नवकेशर सुपर किंग संघाने विजयी सलामी देत २ षटके राखून १३ षटकांत (ओव्हर) ८७ धावा काढून हे आव्हान लिलया पेलत अखेर विजयाची बाजी मारली. या सामन्यात नवकेशर सुपर किंग संघाचे प्रमुख भिमाशंकर शिंदे, कर्णधार धम्मानंद वैद्य, अष्टपैलू खेळाडू डॉ.राजेश इंगोले, प्रा.अनंत कांबळे, विक्रमसेन आगळे, प्रदीप जाधवर, सचिन उपाडे, दर्शन पठाडे, दुर्वांक रघू, नवाजीस अली, ऋषिकेश काटुळे, आज्ञू खान, अद्वैत देशपांडे, चेतन माने, आदि शिंदे आणि यश खरात या खेळाडूंनी दिमाखदार कामगिरी करीत ’उज्ज्ञोत प्रिमियर लीग – २०२५’ मध्ये विजयी सुरूवात केली आहे. आर.आर.पॉलिटेक्निक संघाने नवकेशर सुपर किंग संघाला १५ षटकांत (ओव्हर) विजयासाठी ८४ धावांचे लक्ष दिले. परंतु, नवकेशर सुपर किंगने २ षटके राखून १३ षटकांत (ओव्हर) मध्ये ८७ धावा काढून सहज विजय मिळवला. हा रोमहर्षक सामना पाहण्यासाठी क्रिकेटप्रेमींनी मैदानावर मोठी गर्दी केली होती. योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या राजमाता जिजाऊ मैदानात सुरू असलेल्या या क्रिकेट स्पर्धा अत्यंत जल्लोषात व अनोख्या उत्साहाच्या वातावरणात सुरू आहेत.

# पोखरी रस्त्याची दयनीय अवस्था; ग्रामसडक योजनेअंतर्गत येणाऱ्या रस्त्याची त्वरित दुरुस्तीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२७ मे**



अंबाजोगाई ते पोखरी दरम्यानचा तसेच लातूर महामार्गाला जोडणारा रस्ता अत्यंत खराब अवस्थेत आहे. या रस्त्यावर असलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे स्थानिक नागरिकांना, शाळा–कोलेजातील विद्यार्थी, रुग्ण, तसेच इतर प्रवाशांना दररोज नाहक त्रास सहन करावा लागत आहे. हा रस्ता मुख्यमंत्री ग्रामसडक योजना अंतर्गत येतो, मात्र प्रशासनाने या रस्त्याकडे अजूनही दुर्लक्ष केल्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

अंबाजोगाई शहरापासून अवघ्या सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या पोखरी परिसरातील नागरिक व आजूबाजूच्या गावांतील प्रवासी दररोज या रस्त्याचा वापर करतात. अंबाजोगाईच्या एस.आर.टी. रुग्णालयात रुग्णांना ने–आण करण्यासाठी हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. ऑटो रिक्षा, दुचाकी व अन्य खासगी वाहने याच मार्गाने ये–जा करत असताना त्यांना अनेक वेळा खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका निर्माण होतो.जिल्हा परिषदेच्या हद्दीत येणाऱ्या या रस्त्याची अवस्था इतकी वाईट आहे की, रस्त्यावरील खड्डे हे अक्षरशः मृत्यूच्या सापळ्यासारखे वाटतात. विशेषतः रात्रीच्या वेळेस, रुग्णालयात जाणाऱ्या गरोदर महिलांना किंवा आपत्कालीन रुग्णांना या रस्त्यामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते.

अनेक महाविद्यालयीन विद्यार्थिनी, शेतकरी, किरकोळ व्यापारी आणि सामान्य नागरिक याच मार्गाने प्रवास करतात. मात्र प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे या रस्त्याची दुरुस्ती होत नसल्याने स्थानिक जनतेमध्ये रोष निर्माण झाला आहे.पोखरी येथील स्थानिक नागरिकांकडून सातत्याने मागणी होत आहे की, हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करण्यात यावा. नागरिकांचे म्हणणे आहे की, प्रशासनाने त्वरित लक्ष घालून रस्ता व्यवस्थित करावा.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोली जिल्ह्यातील १०४९ जन्मदाखले रद्द- किरीट सोमय्या

## भाजप नेते किरीट सोमय्या यांनी घेतली जिल्हाधिकारी यांची भेट




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मे**

सन २०२४ मध्ये हिंगोली जिल्ह्यात पुरेसे पुरावे नसताना हिंगोली तहसील कार्यालयातील नायब तहसीलदार यांना कोणताही अधिकार नसतांना १०४९ जन्मदाखले दिले. हे सर्व जन्मदाखले जिल्हाधिकारी यांनी कालच रद्द करण्याचे आदेश दिले असल्याची माहीती भाजपचे नेते किरीट सोमय्या यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भाजपचे नेते किरीट सोमय्या हे मंगळवारी हिंगोली दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, जिल्हा शल्य चिकीत्सक डॉ नितीन तडस यांची प्रमुख उपस्थिती होती.

बैठकीनंतर पत्रकारांशी संवाद साधतांना किरीट सोमय्या यांनी सांगितले की, हिंगोली जिल्ह्यात २०२४ मध्ये पुरेसे पुरावे नसतांना तसेच नायब तहसीलदार यांना अधिकार नसतांना त्यानी १०४९ जन्म दाखले दिले आहेत. हे सर्व जन्म दाखले रद्द करण्याची मागणी उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार मी जिल्हाधिकारी यांचेकडे केली आहे. त्यांनी कालच हे सर्व जन्मदाखले रद्द केले आहेत. ज्या लाभार्थ्यांना हे प्रमाणपत्र दिले आहेत त्यांच्याकडून परत घेण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. अशा लाभार्थ्यांनी कायद्याने आवश्यक आहे अशा तेरा पुराव्यासह अर्ज करणे आवश्यक आहे.

महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली यासंदर्भात एक बैठक घेण्यात आली असून अशा नियमबाह्य दिलेले जन्मदाखले प्रत्येकाच्या घरी जाऊन जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला असून सदरील काम हे महिनाभराच्या आत करण्याचे ठरले आहे. राज्यात ५० हजार जन्मदाखल्यांचे आदेश नायब तहसीलदारांनी कोणताही अधिकार नसतांना दिले असल्याचे उघडकीस आले आहे. त्यामुळे हे सर्व जन्मदाखले रद्द करण्याचा निर्णय उच्च न्यायालयानेच दिला आहे असेही यावेळी किरीट सोमय्या यांनी ठामपणे सांगितले.

यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, सुभाष लदनिया, मनोज शर्मा, श्रीरंग राठोड, राजु यादव, उमेश गुठ्ठे, दिपक सेठी, उमेश नागरे, के के शिंदे, दुर्गादास साकळे आदींची उपस्थिती होती.

# सैन्यदलाच्या सन्मानार्थ औंढ्यात भाजपची तिरंगा रॅली

## भरपावसात जनतेचा तिरंगा रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मे**




भारतीय सैन्याच्या ऑपरेशन सिंदूर मधील पराक्रमाचा गौरव करण्यासाठी आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देण्यासाठी औंढा नागनाथ शहरात मंगळवारी (दि.२७) तिरंगा यात्रा काढण्यात आली. या यात्रेला भरपावसातही औंढेकरांनी प्रतिसाद दिला.

शहरातील नगरपंचायत पासून या तिरंगा यात्रेला सुरुवात झाली. शहरातील नगरपंचायत रोड,देशमुख गल्ली, डॉ. हेडगेवार चौक, मुख्य बाजारपेठ, बसस्थानक मार्गावरून ही यात्रा पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर पूर्णाकृती पुतळ्यापर्यंत काढण्यात आली. या ठिकाणी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर तिरंगा यात्रेची सांगता करण्यात आली. हातात तिरंगा घेत, भारत माता की जय च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. या तिरंगी यात्रेच्या आयोजनाच्या निमित्ताने शहरात देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. ही यात्रा ऑपरेशन सिंदूरच्या समर्थनार्थ असून यातून देशवासीयांना एकतेचा, साहसाचा आणि राष्ट्रप्रेमाचा संदेश दिला गेला. भाजपा जिल्हाध्यक्ष माजी आमदार गजानन घुगे, किसानमोर्चा प्रदेश उपाध्यक्ष सुरजितसिग ठाकूर, प्रदेश कार्यकारणी सदस्य पांडुरंग पाटील, तेजकुमार झांजरी, ओबीसी प्रदेश उपाध्यक्ष शशिकांत वडकुते, प्रदेश सचिव रजनी पाटील, नगरसेविका अश्विनी गणेश पाटील, माजी सभापती मंगलाताई कुटे, तालुकाध्यक्ष सर्जेराव दिंडे, शहराध्यक्ष बबन सोनुने, अंकुश आहेर, सखाराम इंगळे, अँड गणेश ठाकूर, विलास काळे, अँड एस.एस कदम, गणेश पाटील, नागेश माने, प्रा. गजानन कुटे, डॉ लक्ष्मणराव लोखंडे, नवनाथ देशमुख, शंकर काळे, जगदेवराव दिंडे, डीगाबर गिरी, विलास हुडेकर , हरिहर भोपी, सचिन देव, विजय पडोळे, मंगेश गुरव, राजू गिरी, महेश जोशी, सुरेश गीरी गजानन पाठक, संजय ठाकूर, दत्ता दुडके, लक्ष्मण सोनटक्के, विश्वास धोत्रे, प्रशांत स्वामी आदी तिरंगा यात्रेमध्ये सहभागी होते.

# तेरा पुरावे सादर केल्यानंतरच प्रलंबीत जन्मदाखले देणार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मे**

अनेक ठिकाणी केवळ आधार कार्डवरच जन्मदाखले देण्याचे आदेश झाल्याचे निदर्शनास आले आहे. परंतु राज्य शासनाने १२ मार्च रोजी यासंदर्भात काढलेल्या परिपत्रकारनुसार ज्यांची चौकशी झाले आहे परंतु अद्याप त्यांचे जन्मदाखले प्रलंबीत आहेत अशांना तेरा पुरावे सादर केल्यानंतर त्याची पडताळणी करूनच जन्मदाखले देण्याचे आदेश दिल्या जाणार असल्याची माहीती जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली.

भाजपचे नेते किरीट सोमय्या हे मंगळवारी हिंगोली येथे आले असता त्यांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्यासह तहसील, पोलिस व आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांची बैठक घेतली. यावेळी नायब तहसीलदारांना कोणतेही अधिकार नसतांना जन्मदाखले आदेश दिल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीनंतर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी पत्रकारांशी संवाद साधतांना सांगितले की, अनेक ठिकाणी केवळ आधार कार्डवरच जन्मदाखले देण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे. आता राज्य सरकारने १२ मार्चला एक एसओपी जारी केली असून ज्यांना मान्यता दिली आहे अशा जन्म दाखल्याबाबत एक सुनावणी घेण्याचे ठरले असून यासंदर्भात जिल्ह्यातील सर्व तहसीलदारांना राज्याच्या नवीन निर्णयानुसार तेरा पुरावे सादर केल्यानंतरच जन्मदाखले देण्यात यावे अशा सुचना देण्यात येणार आहेत.

तहसीलदार यांनाच जन्म दाखले देण्याचा अधिकार आहे. परंतु काही ठिकाणी जिल्हा सामान्य रूग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र यांनी परस्पर जन्म दाखले दिल्याचेही निदर्शनास आले आहे. यासंदर्भात एक पडताळणी समिती स्थापन करण्यात येणार असून ज्याठिकाणी असा प्रकार झाला असेल किंवा खोटे जन्मदाखले दिल्याचे स्पष्ट झाल्यानंतर अशा विरोधात कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचे यावेळी गुप्ता यांनी सांगितले.

सध्या तहसील कार्यालयाकडून चौकशी झाली परंतु अद्याप ते लाभार्थ्यांना देण्यात आले नाहीत प्रलंबीत १५०० जन्म दाखल्यांची प्रकरणे तहसील कार्यालयाकडे प्रलंबीत आहेत. यापूर्वी जन्म दाखल्यांसाठी अनेक प्रकरणे येत होती परंतु शासनाने नवीन एसओपी काढल्यापासून जन्म दाखल्यांची प्रकरणे येत नाहीत असेही ते म्हणाले.



**हिंगोली- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दि २९ मे गुरूवारी हिंगोली दौऱ्यावर असून त्यांच्याहस्ते विविध विकास कामांचे उद्घाटन तसेच येथील रामलीला मैदानावर भव्य शेतकरी मेळावा आणि कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात येणार आहे. यानिमित्त मैदानावर भव्य वॉटरप्रुफ सभामंडपाची तयारी करण्यात येत आहे. या सभामंडपाची पाहणी करतांना आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे आदी. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### शिक्षक अभियोग्यता चाचणीचे प्रवेशपत्र उपलब्ध

हिंगोली- राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थानाच्या शाळांमध्ये पवित्र या संगणकीय प्रणालीव्दारे शिक्षक भरती करीता शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी-२०२५ या परीक्षेचे ऑनलाईन पध्दतीने २७ मे ते दिनांक ३० मे २०२५ व २ जून ते दिनांक ५ जून २०२५ या कालावधीत आयोजन करण्यात आलेले आहे. यासाठी ऑनलाईन आवेदनपत्र सादर केलेल्या उमेदवारांना प्रवेशपत्राची वेबलिंक महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आल्याचे आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### बालाजी विद्यालयात गुणवंतांचा सत्कार



कळमनुरी- तालुक्यातील मौजेवाई येथील श्री बालाजी विद्यालयाचा माध्यमिक शालांत परीक्षा २०२५ मध्ये शाळेचा निकाल आंशी टक्के लागला सून गुणानुक्रमे शाळेतून करण बाळासाहेब श्रावणे(८३%) प्रथम, गणेश संजय हरण (८२.६०%) द्वितीय तर जयश्री गंगाराम वंजारे (८१.६०) शाळेतून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली आहे. शाळेच्या वतीने या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री गजानन शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत तुकाराम जाधव तर प्रमुख पाहुणे गावचे सरपंच विलास मस्के, केंद्रप्रमुख अशोक देशमुख, सेवानिवृत्त शिक्षक सुभाषराव दुधाळकर यांच्यासह पालक संभाजी मोहोरे, काळूरामजी साबळे, पांडुरंग मुकाडे, कैलास मारकड, गुंफाबाई डुकरे, विश्वंभर असोले, कुंडलिक असोले, लिंबाजी बुरकुले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल सोळंके यांनी करताना विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेश आणि भविष्यातील विविध स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन केले. येत्या शैक्षणिक वर्षापासून शाळेमध्ये इयत्ता आठवी सेमी इंग्रजी माध्यमाची सुरुवात करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी उपस्थित पालकांना सांगितले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गंगाप्रसाद भिसे यांनी तर आभार प्रदर्शन रामकिशन मोरे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मोहन धवसे, दिलीप सावते, द्वारका डुकरे, जगन सरकटे, गंगाधर पोटे, गुलाब पवार, प्रकाश गरड यांनी परिश्रम घेतले.

# हिंगोलीत मध्यम स्वरूपाच्या पावसाला सुरूवात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मे**

हिंगोली जिल्ह्यात मागील दोन दिवसांपासून मध्यम स्वरूपाच्या पावसाला सुरूवात झाली असून पावसामुळे तापमानाचा पारा कमी झाल्यामुळे लोकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

मागील दोन दिवसांपासून जिल्ह्यातील कळमुनरी, औंढा नागनाथ, सेनगाव, वसमत तसेच हिंगोली तालुक्यातील अनेक भागात मध्यम स्वरूपाचा पाऊस पडत आहे. त्यामुळे शेतकरीवर्गात समाधान व्यक्त केले जात आहे. यंदा मान्सून लवकर दाखल झाल्यामुळे अनेकांनी शेतीची मशागत केली नसल्याचे दिसत आहे परंतु आता पाऊस पडल्याने लवकरच पेरणीला सुरूवात होणार असल्याचे चित्र दिसत असून तापमानही कमी झाले आहे. हिंगोली शहरात मंगळवारी पाऊस पडत होता.

# भाजपतर्फे किरीट सोमय्या यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २७ मे**

भारतीय जनता पक्षाचे नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या हिंगोली येथे आले असता हिंगोली विधानसभेचे आ. तान्हाजीराव मुटकुळे आणि जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांनी त्यांचा सत्कार केला.

भाजपचे नेते किरीट सोमय्या हे हिंगोली येथे बोगस जन्मदाखल्याप्रकरणी चौकशीसाठी आले होते. यावेळी भारतीय जनता पक्षाचे हिंगोली विधानसभा मतदार संघाचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी त्यांचा सत्कार केला. यावेळी जिल्हाध्यक्ष गजाननरा धुगे माजी नगरसेवक उमेश गुठ्ठे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, राजू यादव, दिपक सेठी, उमेश नागरे, श्रीरंग राठोड, संजय ढोके आदींची उपस्थिती होती.

बैठकीनंतर भाजपचे नेते किरीट सोमय्या यांचा जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, सुभाष लदनिया, शिवा घुगे आदींची उपस्थिती होती.



# स्वराज्य शिक्षक संघाच्या जिल्हाध्यक्षपदी अविनाश पवार, राज्यउपाध्यक्ष जावळे

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २७ मे**



आश्रम शाळेत कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांच्या समस्या जाणून घेऊन सोडविण्याच्या उद्देशाने जिल्ह्यात स्वराज्य शिक्षक संघ द्वारा आयोजित विभागीय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक तथा सरस्वती पूजन करून करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वराज्य शिक्षक संघाचे संस्थापक प्रदेशाध्यक्ष फत्तेसिंह पवार होते तर प्रमुख पाहुणे म्हणून राज्य संघटक बबनराव वाघमारे धाराशिव जिल्हाध्यक्ष औदुंबर जगताप मराठवाडा विभागीय अध्यक्ष पुरुषोत्तम माने, अशोक सूर्यवंशी, बालासाहेब कराड होते. या प्रसंगी रमेश जावळे यांची स्वराज्य शिक्षक संघच्या राज्य उपाध्यक्ष, विशाल जाधव यांची राज्य समन्वयक तथा अविनाश पवार यांची सर्वानुमते जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण बोडखे यांनी केले तर आभार प्रदर्शन अविनाश दवणे यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वसंत भुसारी, विठ्ठल गिरी, अनिल राठोड, प्रेमानंद धांडे, दुर्गादास देशमुख देविदास पाईकराव, प्रमोद कदम, देविदास सपनर, न्यायपाल बनसोडे, रामा इंगोले, पंढरीनाथ झुंजारे आदीने परिश्रम घेतले.

# रिसाला बाजार येथील स्मशानभूमीतील शेडची दुरावस्था, अतिक्रमणाचा प्रयत्न

**तभा वृत्त सेवा**
**हिंगोली, २७ मे**



शहरातील आदर्श महाविद्यालय परिसरातील नवीन वसाहती तसेच रिसाला बाजार, रेल्वेस्थानक भागातील मयत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारासाठी हिंगोली ते अकोला रस्त्यावर असलेल्या स्मशानभूमीची दुरावस्था झाली असून अग्नीदाह करण्यासाठी बांधण्यात आलेले शेडच्यावरील सर्व पत्रे तुटल्यामुळे अंत्यसंस्कार करताना अनेक समस्या निर्माण होत आहेत. या परिसरात असलेले व्यापारी या भागात अतिक्रमण करण्याचा प्रयत्नही करीत असल्याचे निदर्शनास येत आहे.

आनंद नगर, जिजामाता नगर, सावरकर नगर, रेल्वेस्थानक, रिसाला बाजार, श्रीनगर, तिरूपती नगर, शास्त्री नगर, विवेकानंद नगर आदी भागातील मयत व्यक्तीचे अंत्यसंस्कार करण्यासाठी हिंगोली ते अकोला रस्त्यावर स्मशानभूमीची व्यवस्था प्रशासनाच्यावतीने करण्यात आली आहे. या स्मशानभूमीत मयत व्यक्तीला अग्नीदाह देण्यासाठी दोन पत्र्याची शेड उभारण्यात आले आहेत. परंतु या शेडपैकी एक शेडची पत्रे संपूर्णपणे तुटल्यामुळे धोकादायक बनली आहेत. तसेच पावसाळ्यात या शेडमध्ये पार्थिवावर अंत्यसंस्कार करणेही अवघड होत आहे. याशिवाय स्मशानभूमीची संरक्षण भिंत एका बाजूला पडल्यामुळे काही कारखानदार येथील जागेत माल ठेवून अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. नगर पालिकेने स्मशानभूमीतील पत्र्याचे शेडची दुरूस्ती करावी तसेच संरक्षण भिंत बांधावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.